बिसेन डेन्टल केअर
डॉ.दिप(पंकज) बिसेन डॉ.खुशबू बिसेन(पटले)

दंत व मुख रोगविशेषज्ञ
बी.डी.एस.(नागपूर)

ताज मेरीप्लेक्स, गर्ल्स कॉलेज रोड गोंदिया
सकाळी:- ११ ते ३ सायं ६ ते ९ वाजेपर्यंत संपर्क:- ९५४५६८१८७०

साप्ताहिक http://berartimes.com
# बेरार टाईम्स
मुख्य संपादक :- खेमेंद्र कटरे, सहसंपादक :- सुरेश भदाडे



गोंदिया शहरात बेरार टाईम्सचा अंक चौरसिया पान सेंटर जयस्तंभ चौक गोंदिया येथे उपलब्ध

आर.एन.आय.क्र. एमएएचएमएआर/२०११/४६५१० | वर्ष -१३ गोंदिया | अंक ०२ | बुधवार,दि.२० डिसेंबर २०२३ | पृष्ठ-४ | किंमत-३ रुपये | Postal Reg.No.NPMFL/107/2022-2024

# धानाला प्रतिहेक्टर २० हजार रूपये बोनसची घोषणा
## मुख्यमंत्र्याची अधिवेशनात घोषणा: प्रफुल्ल पटेल यांनी घातले होते साकडे

**गोंदिया:** शासकीय धान खरेदी केंद्रावर धानाची विक्री करणाऱ्या शेतकऱ्यांना दरवर्षी प्रोत्साहन अनुदान म्हणून शासनाकडून बोनस जाहीर केला जातो. मुख्यमंत्री एकनाश शिंदे यांनी सोमवारी (दि.१८) नागपूर येथे सुरु असलेल्या विधीमंडळाच्या हिवाळी अधिवेशनात धानाला प्रतिहेक्टर २० हजार रुपये बोनस दोन हेक्टरपर्यंत देण्याची घोषणा केली. धानाला बोनस मिळावे म्हणून खा. प्रफुल्ल पटेल यांनी अधिवेशनादरम्यान मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री यांची भेट घेऊन निवेदन दिले होते. त्यांच्या मागणीला यश आले आहे.

यंदा अवकाळी पावसामुळे मोठ्या प्रमाणात खरीप हंगामातील धान पिकांचे नुकसान झाले होते. त्यामुळे उत्पादक शेतकरी संकटात आला होता. धान उत्पादक शेतकऱ्यांना या संकटातून सावरण्यासाठी हेक्टरी नुकसान भरपाई व धानाला बोनस जहीर करण्याची मागणी केली जात होती. दरम्यान मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी भंडारा येथे आयोजित एका कार्यक्रमात धानाला बोनस हिवाळी अधिवेशनात जाहीर केला जाईल अशी ग्वाही दिली होती.



**अवकाळी पावसामुळे धान पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याने धान उत्पादक शेतकरी आर्थिक संकटात सापडला होता. त्यांना यातून थोडा दिलासा मिळावा म्हणून बोनस आणि अवकाळी पावसामुळे झालेल्या नुकसानीची भरपाई देण्यात यावी यासाठी शासनाकडे पाठपुरावा केला होता. त्यानंतर शासनाने धानाला हेक्टरी २० हजार रुपये बोनस जाहीर केला आहे.**

**प्रफुल्ल पटेल,** खासदार

**धान उत्पादक शेतकऱ्यांना प्रतिहेक्टर २५ हजार रुपये बोनस जाहीर करण्यात यावा. यासाठी सुरुवातीपासूनच मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री यांच्याकडे पाठपुरावा केला. तसेच विधीमंडळाच्या सुरु असलेल्या हिवाळी अधिवेशनातसुद्धा हा मुद्दा लावून धरला. त्याचीच दखल शासनाने घेऊन धानाला प्रतिहेक्टर २० हजार रुपये बोनस दोन हेक्टरपर्यंत देण्याची घोषणा केली. यामुळे धान उत्पादक शेतकऱ्यांना मदत होणार आहे.**

**विनोद अग्रवाल,** आमदार

तर खा. प्रफुल्ल पटेल यांनी गोंदिया-भंडारा जिल्ह्यातील आ.मनोहर चंद्रीकापुरे, आ. राजू कारेमोरे, आ.विनोद अग्रवाल, आ.विजय रहांगडाले, माजी आमदार राजेंद्र जैन, माजी आमदार गोपालदास अग्रवाल, सुनील फुंडे अध्यक्ष यांच्यासह अविनेशनादरम्यान मुख्यमंत्री व दोन्ही उपमुख्यंत्र्यांची भेट घेऊन धान उत्पादक शेतकऱ्यांच्या व्यथा मांडल्या होत्या.

यावेळी निवेदन देऊन बोनस व अवकाळी पावसामुळे झालेल्या नुकसान भरपाईची मागणी केली होती. मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्र्यांनी बोनस जाहीर करण्याचे आश्वासन दिले होते. तेव्हापासूनच शेतकऱ्यांच्या नजरा याकडे लागल्या होत्या. दरम्यान सोमवारी विधीमंडळ सभागृहात प्रश्न उत्तराच्या तासात मुख्यमंत्री एकनाश शिंदे यांनी धानाला हेक्टरी २० हजार रुपये बोनस दोन हेक्टरपर्यंत देण्यात येत असल्याचे जाहीर केले. यामुळे धान उत्पादक शेतकऱ्यांना दिलासा मिळला असल्याच्या प्रतिक्रीया व्यक्त कोत आहे.

### मागील वर्षीच्या तुलनेत पाच हजार रुपयांनी वाढ

**राज्य सरकारने मागील वर्षी शासकीय धान खरेदी केंद्रावर धानाची विक्री करणाऱ्या शेतकऱ्यांना हेक्टरी १५ हजार रुपये बोनस दोन हेक्टरपर्यंत जाहीर केला होता. यावर्षी यात वाढ करीत धानाला हेक्टरी २० हजार रुपये बोनस दोन हेक्टरपर्यंत जाहीर केला आहे. मागील वर्षापेक्षा यंदा बोनसमध्ये पाच हजार रुपयांची वाढ झाली आहे.**

### यापुर्वी प्रतिक्विंटल दिला जात होता बोनस

**राज्य सरकारने मागील वर्षांपासून धानाला प्रतिहेक्टर बोनस जाहीर करण्यास सुरुवात केली. त्यापुर्वी महाविकास आघाडी सरकारने धानाला प्रतिक्विंटल ७०० रूपये बोनस दिला होता. यंदा यात थोडी वाढ केली आहे.**

### २७ हजार रुपये हेक्टर नुकसान भरपाई

**अवकाळी पावसामुळे झालेल्या नुकसानीची ओलीताखालील शेतीला हेक्टरी २७ हजार रुपये तर कोरडवाहू शेतीला प्रतिहेक्टर १३६०० रुपये मदत मिळणार आहे. यासाठी तीन हेक्टरपर्यंत मर्यादा घातली आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना मदत होणार आहे.**

# विविध मागण्यांना घेऊन ग्रामसेवकांसह सरपंचाचे तीन दिवस कामबंद आंदोलन



**गोंदिया-** आपल्या विविध मागण्यांना घेऊर् सरपंचासह ग्राम सेवकांनी १८ ते २० डिसेंबर या तीन दिवशी कामबंद आंदोलन पुकारले आहे. आंदोलनाच्या दुसऱ्या दिवशी गोंदिया जि.प.चे मुख्य कार्यकारी अधिकारी अनिल पाटील यांना निवेदन देण्यात आले.या आंदोलनात जुनी पेंशन योजना लागू करण्याची मागणी ग्रामसेवक संघटनेचे जिल्हाध्यक्ष कमलेश बिसेन यांनी केली आहे.

महाराष्ट्रात प्रथमच ग्रामपंचायत स्तरावर काम करणाऱ्या सर्व कर्मचारी संघटना यामध्ये ग्रामसेवक युनियन, अखिल भारतीय सरपंच परिषद ग्राम पंचायत सदस्य, संगणक परिचालक संघटना, ग्रामपंचायत कर्मचारी संघटना व ग्रामरोजगार सेवक संघटना यांनी एकत्रीतरित्या विविध प्रलंबीत न्याय मागण्यांसाठी शासनाचे लक्षवेध करण्याकरीता १८ ते २० डिसेंबर या तीन दिवसांचे कामबंद आंदोलन सुरू केले आहे. या कालावधीत कामबंद आंदोलन करुन जिल्ह्यातील सर्व पंचायत समिती कार्यालयांसमोर एक दिवस सर्व संघटनांचे वतीने धरणे आंदोलन करण्यात आले.

न्याय हक्कांसाठी ग्रामपंचायत स्तरावर ग्रामविकासाचा महत्वाचा घटक असूनही ग्रामपातळीवर काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या न्याय मागण्या प्रलंबीत आहेत.या आंदोलनाचे नेतृत्व जिल्हाध्यक्ष कमलेश बिसेन, सचिव कुलदीप कापगते, उपाध्यक्ष सचिन कुथे, भारती वाघमारे, शैलेश परिहार, योगेश रूद्रकार, योगराज बिसेन, रजनी शहारे, रामेश्वर जमईवार, रितेश शहारे, सुरेश वाघमारे, टिकाराम जनबंधू, प्रदीप ठाकरे, किशोर आचले, नरेंद्र गोमासे, नम्रता रंगारी यांनी केले.

**ग्रामसेवकांच्या या आहेत मागण्या :**

ग्रामसेवक व ग्राम विकास अधिकारी ही दोन्ही पदे एकत्रीत करुन नविन पंचायत विकास अधिकारी पद निर्माण करणे, ग्रामसेवक ग्रामविकास अधिकारी यांच्याकडील अतिरिक्त काम कमी करण्यासाठी स्थापन झालेल्या समितीच्या अहवालातील शिफारसींची अंबलबजावणी करणे, ग्रामसेवक पदाचे सेवा प्रवेश नियमात सुधारणा करुन शैक्षणिक अहर्ता कोणत्याही शाखेची पदवी करणे, महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनीयम १९५८ चे कलम ४९ चे नियमात सर्व जिल्हा परिषदांचे प्राप्त अहवालानुसार सुधारणा करणे, विस्तार अधिकारी पदांची संख्या वाढविणे, जुनी पेंशन योजना लागू करणे, कंत्राटी पद्धतीने ग्रामसेवक भरती बंद करणे, विस्तार अधिकारी (पंचायत) या पदांची जिल्हा परिषद गटनिहाय निर्मिती करणे, शिक्षकांप्रमाणे ग्रामसेवकांचे प्रश्न विधान परिषदेत मांडण्यासाठी प्रतिनिधीत्व मिळणे या मागण्यांचा समावेश आहे.



### दिनदर्शिकेचे प्रकाशन

**बेरार टाईम्स वृत्तपत्राचे २०२४ या वर्षीचे दिनदर्शिकेचे प्रकाशन राज्याचे शालेय शिक्षण मंत्री मा.ना.दीपकजी केसरकर यांच्या हस्ते नागपूर येथील हिवाळी अधिवेशनादरम्यान त्यांच्या विधानभवनातील कक्षात करण्यात आले. यावेळी संपादक खेमेंद्र कटरे, शिवसेना जिल्हाप्रमुख मुकेश शिवहरे व इतर मान्यवर उपस्थित होते.**

## *नायब तहसीलदारांचे दोन तास धरणे आंदोलन*



**गोंदिया:** नायब तहसीलदार संवर्गाच्या वेतनवाढीच्या मागणीसाठी येथील नायब तहसीलदारांनी सोमवारी (दि.१८) दोन तास धरणे आंदोलन केले. यासंदर्भात निवासी उपजिल्हाधिकारी स्मिता बेलपत्रे यांच्याकडे मुख्यमंत्री, महसूलमंत्री व अपर मुख्य सचिव यांच्या नावाने निवेदन देण्यात आले. तसेच मागण्या मंजूर न झाल्यास २८ डिसेंबरपासून बेमुदत कामबंद आंदोलन करण्याचा इशारा या निवेदनातून देण्यात आला आहे.

महाराष्ट्र राज्य तहसीलदार व नायब तहसीलदार संघटनेने नायब तहसीलदार राजपत्रित वर्ग-२ यांचे ग्रेड पे ४८०० रुपये करण्यासाठी के.पी. बक्षी यांच्या अध्यक्षतेखालील त्रुटी समिती (बक्षी समिती) समोर सादरीकरणावर तत्काळ कार्यवाही करण्यात यावी, या मागणीला घेऊन ५ डिसेंबर रोजी एकदिवसीय रजा आंदोलन व विभागीय आयुक्त कार्यालय येथे धरणे आंदोलन केले होते. परंतु शासनाने त्याची दखल घेतली नाही. त्यामुळे सोमवारी (दि.१८) नायब तहसीलदारांनी दोन तास धरणे आंदोलन केले.

आंदोलनात नायब तहसीलदार के.के.अदाने, विशा सोनवाने, पी.बी.तिवारी, सी.एन. बाबडे, एन.एस.चवरे, सीमा पारणे, अप्पासाहेब वनकडे, एन.ए. विटले, शरद हलमारे, अश्विनी नंदेश्वर, संजय धार्मिक यांचा समावेश होता.

## डिसेंबर अखेरीस गारठा वाढणार...

**नागपूर :** उत्तर भारतात पसरलेल्या थंडीच्या लाटेचा परिणाम आता महाराष्ट्रावर देखील जाणवू लागला आहे. किमान तापमानात वेगाने घसरण होण्यास सुरुवात झाली आहे. दरम्यान, डिसेंबरच्या अखेरीस किमान तापमानात घट होऊन थंडीची लाट आणखी तीव्र होण्याची शक्यता भारतीय हवामान खात्याने वर्तवली आहे. उत्तर भारतात सध्या थंडीची प्रचंड लाट पसरली आहे. किमान तापमानाचा पारा दहा अंश सेल्सिअसपेक्षाही कमी झाला आहे. त्याचा परिणाम मध्यप्रदेश तसेच महाराष्ट्रावर देखील होत आहे. यावर्षी डिसेंबर अखेरीस प्रचंड गारठा अनुभवावा लागणार, असा अंदाज हवामान खात्याने वर्तवला आहे.उपराजधानीसह विदर्भातील तीन शहरांचे तापमान १० अंश सेल्सिअसपेक्षा कमी झाले आहे. गोंदिया आणि यवतमाळ शहराचे किमान तापमान ९ अंश सेल्सिअस इतके नोंदवण्यात आले असून नागपूर शहरात ९.४ अंश सेल्सिअस इतक्या तापमानाची नोंद करण्यात आली आहे.

# नागझिरा व्याघ्र प्रकल्पाला हवा ब्रँडअॅम्बेसिडर

**गोंदिया:-** विदर्भ हे टायगर कॅपिटल म्हणून ओळखले जात असून ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्पा शेजारीच असलेल्या आणि १६ वाघांची संख्या असलेल्या नवेगाव न्यु नागझिरा व्याघ्र प्रकल्पालाही आता थोड्या का प्रमाणात झळाली येऊ लागली आहे. या हंगामात दिवाळीच्या सत्रापासून पिटेझरी व चोरखमारा या प्रवेशद्वारावरुन येणऱ्या पर्यटकांना वाघ वाघिणींनी आपल्या बछड्यासह दिलेल्या दर्शनामुळे पर्यटकांचाही ओढा नक्कीच वाढला आहे.मात्र ताडोबाच्या तुलनेत या एनएनटीच्या ब्रँडीगसाठी कुणी तरी द्या अशी म्हणण्याची वेळ आली आहे.

त्यातच या प्रकल्पाकरीता १६ कोटी रुपयाचा सीएसएस निधी मंजूर झालेला असला तरी हे आर्थिक वर्ष संपायला अवघे तीन महिने शिल्लक असतांनाही २ कोटी रुपयाचा निधीच संबधित विभागाला मिळालेला आहे.तर १४ कोटी रुपयाचा निधी अजूनही शिल्लक आहे.त्या निधीत ४ कोटी रुपयाचा निधी हा प्रशिक्षण,सरंक्षणावर खर्च करावयाचा आहे.या पर्यटन स्थळाला जवळपास ४५ हजार पर्यटक दरवषी भेट देण्याकरीता



येत असून सरकारने अधिक बँडिंग केल्यास पर्यटकांची संख्या वाढून स्थानिक रोजगार वाढण्यातही मदत होऊ शकणार आहे.नवेगाव न्यु नागझिरा व्याघ्रप्रकल्पात पर्यटकांकरीता १० प्रवेशद्वार असून रेल्वेची लहान लाईन असताना सुरु असलेले मुरदोली येथील प्रवेशद्वार मात्र मोठ्या ब्राडग्रेजरेल्वेलाईन झाल्यानंतर बंद पडले आहे.

त्यातच गेल्या मे महिन्यात ब्रम्हपूरी वनविभागातून आलेल्या दोन वाघिणीनंतर परत तीन वाघिणी या व्याघ्रप्रक्लपात आणण्याच्या हालचालींना वेग आलेला आहे.बिबट आणि हिरवेगार जंगलाकरीता प्रसिध्द असलेला हा एनएनटीआर व्याघ्रप्रकल्प वाघांच्या प्रवासाकरीताचा कॉरिडार म्हणूनही ओळखला जातो.व्याघ्रदर्शनापेक्षा जंगल टुरीझमकरीता हा प्रकल्प अधिक प्रसिध्द असला तरी या प्रकल्पाच्या क्षेत्रातील वन्यप्राण्यांच्या संख्या दिवसेंदिवस कमी होत असल्यानेच वाघ आणि बिबट्यांचे गावाकडील भागात विचरण अधिक बघावयास मिळत आहे.

या एनएनटीआर व्याघ्र प्रकल्पात आजच्या घडीला नवेगाव राष्ट्रीय उद्यान, नवेगाव वन्यजीव अभयारण्य, नागझिरा वन्यजीव अभयारण्य,न्यू नागझिरा वन्यजीव अभयारण्य आणि कोका वन्यजीव अभयारण्य यांचा समावेश आहे.याचे क्षेत्रफळ १३३.८८ चौ.किमी आहे. पैकी १७.६ हेक्टर नागझिरा अभयारण्याला देण्यात आले आहे.तर २५१.४६ हेक्टर जमीन कोका अभयारण्यास देण्यात आली आहे. उर्वरित क्षेत्र अतिसंरक्षित व्याघ्र क्षेत्र म्हणून संरक्षित केले आहे.या व्याघ्र प्रकल्पातील वनक्षेत्रात २०९ प्रकारचे पक्षी, ९ प्रकारचे सरीसृप, २६ प्रकारचे सस्तन प्राणी ज्यात दुर्मिळ लांडगे, चांदी अस्वल, तडस यांचा समावेश आहे. या व्याघ्र प्रकल्पाला दरवषी पर्यटक मोठ्या संख्येने येतात. व्याघ्र प्रकल्पातील सिमेत विचरण करणारे १२ वाघ व्याघ्रप्रकल्पाची शान आहेत. ४२३ रानगवे,२१९ रानडुकर,११९ हरणांची नोंद या मे महिन्यातील सर्वेक्षणात घेण्यात आली आहे.

### व्याघ्र प्रकल्पात "हॉलीडे होम'मुळे वन्यजीवांना धोका

**नवेगाव-नागझिरा हे व्याघ्र प्रकल्प असून नवेगाव-नागझिरा अभयारण्यालगत असलेल्या गावांमध्ये वन्य प्राण्यांचा वावर वाढला आहे. परिणामी मानवी जीवनावरही वन्य प्राण्यांचे हल्लयाचे प्रमाण वाढले आहेत. हॉली-डे होम ही संकल्पना कोअर झोनमध्ये साकार हात असल्याने वन्य प्राण्यांच्या जीवाला धोका पोहचला आहे.मुळात कोअर झोनमधील हॉली-डे होम ही संकल्पनाच वन्य प्राण्यांसाठी घातक ठरली असून वनविभागाने यावर मंथन करणे आवश्यक झाले आहे. नागझिरा अभयारण्याच्या मध्यभागी थाडेझरी हे गाव असून गावालगत मालगुजारी तलाव आहे. वन विभागाने या गावाचे दुसऱ्या ठिकाणी पुनर्वसन केले. या ठिकाणी हॉली-डे तयार करण्यात आले होते. पर्यटनासाठी सुविधा म्हणून मागील काही वर्षात या क्षेत्रात हॉली-डे होमची संकल्पना मोठ्या प्रमाणात रूजू झाली. मात्र, हॉली-डे होममुळे व परिसरात राहणाऱ्या नागरिकांमुळे वन्य प्राण्यांच्या अधिवासाला धोका निर्माण झाला आहे.**

# ओबीसींना आरक्षणातून बाहेर काढण्याचा प्रयत्न-मंत्री छगन भुजबळ

**ठाणे:-** एकीकडे ओबीसी समाजातून जातींना काढून टाकण्याचा प्रयत्न करण्यात येतोय तर दुसरीकडे ओबीसीत घुसण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे. शिंदे समिती कडून खोटे कुणबी दाखले देण्यात येत आहे. मराठा समाजाला ओबीसी तून आरक्षण दिलं तर ओबीसी समाजातील बांधवांच राजकीय आरक्षण सुध्दा धोक्यात येईल. अगदी सरपंच सुद्धा कुणी होऊ शकणार नाही. ओबीसींना आरक्षणातून बाहेर काढण्याचा प्रयत्न सुरू आहे. त्यामुळे सर्व ओबीसी बांधवांनी ओबीसी म्हणून एकत्र या आणि ओबीसी सर्व एक आहे हे दाखवून द्या असे आवाहन राज्याचे अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री छगन भुजबळ यांनी केले. ठाण्यातील आगरी महोत्सव मैदान येथे ओबीसी निर्धार महामेळावा पार पडला. त्यावेळी ते बोलत होते.

यावेळी प्रकाश शेंडगे, माजी मंत्री महादेव जानकर, माजी मंत्री जगन्नाथ पाटील, राष्ट्रीय ओबीसी महासंघाचे डॉ.बबनराव तायवाडे, मुस्लिम ओबीसी महासंघाचे शब्बीर अन्सारी, प्रा.टी.पी.मुंडे, प्रा.राजाराम साळवी, आ. किसन कथोरे, आ.रईस शेख, आ.महेश चौघुले, शांताराम मोरे, समीर भुजबळ, पंकज भुजबळ, सुरेश तावरे, योगेश म्हात्रे, पांडुरंग भरोरा, जी.डी.तांडेल, दशरथ पाटील, रामोशी समाजाचे नेते दौलतराव शितोळे, यशवंत सोरे यांच्यासह ओबीसी समाजाचे नेते आणि ओबीसी बांधव बहुसंख्येने उपस्थित होते.

यावेळी मंत्री छगन भुजबळ म्हणाले की, आगरी कोळी समाजाचे कुणबी समाजाचे उपकार आपल्यावर आहे. शेतकऱ्यांना गुलामगिरी समजावून सांगणाऱ्या ज्योतिबा फुले यांना १८८९ मध्ये मांडवी-कोळीवाडा येथे महात्मा ही पदवी देणारे आगरी-कोळीच होते. भारतातला सर्वात मोठा शेतकरी संप १९३२ ते १९३९ मध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि नारायण नागू पाटील यांच्या नेतृत्वाखाली करुन ऐतिहासिक कुळकायदा निर्माण करणारे आगरी-कोळी लोकच होते. चिरनेर जंगल सत्याग्रहामध्ये आगरी-कोळी लोकच होते. स्वातंर्त्यानंतर लोकनेते मा.श्री.दि.बा.पाटील साहेब यांच्या नेतृत्वाखाली १९८४ साली सिडकोच्या अन्यायी भूसंपादनाविरोधात जासई येथे पाच हुतात्मे देऊन संपूर्ण भारतात कुठेही लागू नसलेली साडेबारा टक्के विकसित भूखंड शेतकऱ्यांना देणारी पुनर्वसन योजना साकार करणारे आगरी-कोळी लोकच असल्याचे सांगितले.

ते म्हणाले की, छत्रपती शिवाजी महाराजांनी आगरी-कोळी बांधवांच्या उपस्थितीत स्वराज्याच्या व भारताच्या इतिहासातील पहिल्या आरमाराची मुहूर्तमेढ रोवली होती. छत्रपती शिवाजी महाराजांबरोबरच पेशव्यांनीही आगरी-कोळी बांधवांमधील धैर्य, काटकपणा आणि प्राण पणाला लावण्याची वृत्ती ओळखून स्वराज्याच्या मोहिमांमध्ये सहभागी करुन घेतले होते. छत्रपती शिवाजी महाराजांनी जावळीच्या मोऱ्यांचा पाडाव केल्यानंतर कल्याण-भिवंडी पादाक्रांत केली. त्यानंतर पोर्तुगीज कारागिरांच्या साथीला आगरी-कोळी बांधवांना देत जहाजबांधणी सुरू केली होती. मुरुड-जंजिरा मोहिमेत १६७५ मध्ये कुलाब्याचे लायजी पाटील यांनी किल्लयाच्या तटाला शिड्या लावण्याची अशक्यप्राय कामगिरी केली. मात्र, वेळेवर सैन्य न आल्यामुळे विजय हुकला होता.

लायजी पाटील यांच्या पराक्रमाची दखल छत्रपती शिवाजी महाराजांनी घेऊन त्यांना रायगडावर सन्मान करुन पालखी



नावाचे गलबत भेट दिले होते. सन १७३९ मध्ये द्रोणागिरीच्या मोहिमेत मानाजी आंग्रे यांनी आगरी-कोळी भूमिपूत्रांची मोट बांधली होती. त्यातील ८०० सैनिकांची कुमक उरण-करंजा बेटावर तैनात केली. त्या ठिकाणी हल्ला करण्याचा इंग्रजांचा विचार होता. पण आगरी बांधवांच्या शौर्याची माहिती मिळाल्यावर इंग्रजांनी हल्लयाचा विचार सोडून दिला असल्याचे म्हणाले.

ते म्हणाले की, पेशव्यांच्या काळात वसईच्या मोहिमेत चिमाजीआप्पांना आन ठाकूर व मान ठाकूर यांनी मदत केली होती. त्यांनी वसई किल्लयाच्या बुरुजाला चिरे पाडून सुरुंग भरला होता. या सुरुंगांच्या स्फोटाने बुरुज उद्धवस्त होऊन मराठ्यांचे सैन्य किल्लयात घुसले. परंतु, आन व मान ठाकूर यांनी स्फोटात बलिदान दिले. बोर्लीजच्या दौराजी पाटील यांनीही वसईच्या मोहीमेत सहभाग घेतला होता. तर अंजुरच्या गंगाजी नाईक-अंजुरकर यांनीही पेशव्यांच्या सैन्याला मदत केली होती. पेशवा रघुनाथराव पेशवा यांनी अटकेपार झेंडा फडकविला होता. या मोहिमेतही ५० आगरी-कोळी योद्धे सहभागी असल्याचे ते म्हणाले.

ते म्हणाले की, ओबीसींच्या आंदोलनात ?ड.जनार्दन पाटील साहेबांचं मोठ योगदान होत त्यांची आज आठवण येत आहे.आमचा विरोध मराठा समाजाला नाही. आमदारांची घर जाळणा?याना आमचा विरोध आहे. आमचा विरोध दादागिरीला, झुंडशाहिला आहे, राज्यात अशांतता निर्माण करणा?या आमचा विरोध आहे असल्याचे त्यांनी सांगितले.आमची लायकी नाही असं म्हणणा?यानी लक्षात घ्यावं की आमची ओबीसीची मुलं तुमच्या पेक्षा अधिक हुशार आहे. त्यामुळे आमची लायकी काढणारा तू कोण असा सवाल त्यांनी उपस्थित केला.

ते म्हणाले की, छत्रपती शिवाजी महाराजांचे नाव घेऊन हल्ला करणारे हे नेमकी कोण आहे असा सवाल करत छत्रपती शिवाजी महाराजांचा इतिहास हा मावळ्यांचा इतिहास म्हणून लिहिला जातो. ते मावळे आम्ही आहोत. त्यांच्या सैन्यात अठरा पगड समाजातील मावळे होते. कुठल्या एका जातीचे नाही असे त्यांनी नमूद केले.आम्हाला गाव बंदी केली गेली परंतु काही नेत्यांना मात्र गावबंदी नाही. तरी राज्यात अशांतता निर्माण आम्ही करतोय असं म्हटल जातय. प्रत्यक्षात मात्र आम्हाला मारण्याच्या धमक्या दिल्या जाताय तरी त्यांच्यावर कुठलीही कारवाई होत नाही असा सवाल उपस्थित करत शासन किती त्याच्या पाया पडणार, किती डोक्यावर चढवणार, सरकार किती झुकणार ही लोकशाही आहे की, लोकशाहीची थट्टा आहे असा सवाल त्यांनी उपस्थित केला.

ते म्हणाले की, ओबीसींना २७ टक्के आरक्षण असल्याचे म्हटले जाते. मात्र अद्याप पर्यत ९ टक्के देखील नोकऱ्यांमध्ये संधी ओबीसी विद्यार्थ्यांना मिळालेली नाही. त्यामुळे शासनाने पहिल्यांदा नोकऱ्यांमधील ओबीसींचा अनुशेष भरावा असे आवाहन त्यांनी केले.

ते म्हणाले की, मराठा नेत्यांनी जरांगेची भेट घेऊन ते हे का नाही सांगत की, ओबीसी आरक्षणातून वाटा मागणे चूक आहे,जाळपोळ करणे चूक आहे,जिवंत काडतुसे बाळगणाऱ्यांसोबत संबंध ठेवणे चूक आहे, पोलिसांवर हल्ला करणे चूक आहे, गुन्हे मागे घेण्यासाठी दबाव टाकणे चूक आहे, गावबंदी करणे चूक आहे, एका समाजाच्या मागणीसाठी शहर बंद जाहीर करून इतर सर्व लोकांना वेठीस धरणे चूक आहे,अमुक अमुक तरखेपर्यतच आरक्षण द्या अशी बालिश मागणी धरून शासनाला धमकी देणे चूक आहे, सरसकट कुणबीची मागणी करुन आरक्षण मिळवण्याची प्रक्रियाला फाटा मारून ओबीसींच्या ताटातले आरक्षण मागणे बेकायदेशीर आणि चूक आहे असे सवाल त्यांनी उपस्थित केला.

ते म्हणाले की, माझा कार्यक्रम करू असे म्हणणा?या जरांगेनी पहिले अरे तू तुझी तब्येत सांभाळ अशी टीका केली. माझा कार्यक्रम करील त्याला मी अजिबात घाबरत नाही. मात्र जे ओबीसींच्या विरोधात बोलताय त्यांचा येणाऱ्या निवडणुकीत कार्यक्रम केल्याशिवाय राहू नका, माझी वाट न बघता ठीक ठिकाणी सभा सुरू ठेवा. ओबीसीला जागे करा आपले हक्क अबाधित ठेवण्यासाठी लढाईची तयारी करा असे आवाहन मंत्री छगन भुजबळ यांनी उपस्थितांना केले.

## संपादकीय

# संसदेवरील हल्ला योगायोग का प्रयोग?

देशाचे सर्वोच्च सभागृह असलेल्या संसदेवर १३ डिसेंबर २००१ आणि १३ डिसेंबर २०२३ या दोन दिवशी हल्ला झाला. या दोन्ही वेळा पंतप्रधान हे भारतीय जनता पार्टीचेच होते. २००१ साली स्व. अटलबिहारी वाजपेयी पंतप्रधान होते. तर सध्या नरेंद्र मोदी आहेत. मग हा योगायोग आहे की प्रयोग आहे?

लोकसभेत काही तरुणांनी प्रेक्षक गॅलरीतून उड्या मारून बुटात लपवलेले गॅस स्टीक काढून पिवळ्या रंगाचा गॅस सोडून खासदारांमध्ये दहशत पसरवण्याचा प्रयत्न केला. अशा रंगीत गॅस स्टीक सैन्यदल किंवा सुरक्षा रक्षक हे सिग्नल देण्यासाठी वापरतात. पण ते तांबड्या रंगाचा गॅस असलेल्या स्टीक वापरतात. संसदेत काढलेल्या गॅस स्टीकमधून पिवळ्या रंगाचा गॅस पसरलेला आपण सर्वांनीच बघितला. फॉस्फरसपासून तयार होणाऱ्या पिवळ्या रंगाचा गॅस श्वसन व त्वचेसाठी घातक असतो. पण श्रीराम कृपेने कोणाला काही झालं नाही. पण मला सांगायचं आहे ते वेगळेच. सन २००१ च्या संसदेवरील हल्ल्याच्या दिवशी सकाळी संसदेच्या दोन्ही सभागृहांचे कामकाज सुरू झाले. त्यावेळी काँग्रेस अध्यक्षा सोनिया गांधी या लोकसभेच्या खासदार असल्याने सभागृहात होत्या. पण काही वेळातच त्या सभागृहातून बाहेर पडून थेट घरीच गेल्या. त्या घराकडे निघून अर्ध्या रस्त्यात गेल्यावर संसदेच्या आवारात घुसत अतिरेक्यांनी गोळीबार सुरू केला. लोकसभेच्या कामकाजात भाग घेण्यासाठी आलेल्या सोनिया गांधी अचानक घरी का गेल्या? त्या घरी गेल्यावरच अतिरेक्यांनी हल्ला कसा काय केला? त्या संसदेच्या आवारात किंवा संसद भवनात असताना हल्ला का केला नाही? याची उत्तरं फक्त सोनिया गांधीच देऊ शकतात.

लोकसभेत जेव्हा तरुणांनी उड्या मारून पिवळा गॅस सोडला, तेव्हाही सोनिया गांधी लोकसभेत आलेल्याच नव्हत्या. लोकसभेचे कामकाज सुरू असताना अचानक तरुणांनी सभागृहात उड्या मारल्या तेव्हा सर्वचजण भांबावले होते. मात्र काँग्रेसचे नेते राहुल गांधी हे आपल्या जागी उभे राहून शांतपणे हे सगळं बघत होते. आकस्मिकपणे घडलेल्या या घटनेचा कोणताच परिणाम त्यांच्या देहबोलीतून दिसत नव्हता. जणू काही चित्रपटातील दृष्य आपण बघतोय, अशा आर्विभावात ते शांतपणे तरुणांचे उड्या मारणे, बुटातून गॅस स्टीक काढून गॅस सोडणे, खासदारांनी त्यांना धरण्यासाठी पळापळ करणे, पकडल्यावर धुलाई करणे या सगळ्याच घटना राहुल गांधी शांतपणे आपल्या जागेवर उभे राहून बघत होते. या घटनेचे त्यांना जराही आश्चर्य वाटले नाही तर त्यांना धक्का बसणे तर दूरच! अशा प्रतिक्रिया येण्यासाठी फक्त दोनच गोष्टी कारणीभूत असतात, एक म्हणजे आपण त्यातले नाही, जे चाललंय त्याच्याशी आपल्याला काहीच देणं-घेणं नाही. अन दुसरी म्हणजे घडणाऱ्या घटनेची पटकथा त्या व्यक्तीला अगोदरपासूनच माहिती असते.

आता राहुल गांधी यांच्याबाबत यातील कोणती शक्यता खरी वाटते, ते विचार करुन ज्याचं त्यानं ठरवायचे आहे. आणखी एक सन २००१ साली सोनिया गांधी संसदेतून बाहेर पडल्यावर अतिरेक्यांनी संसदेवर हल्ला केला होता. आताही सोनिया गांधी लोकसभेच्या सदस्या असूनही ही घटना घडली तेव्हा त्या सभागृहात नव्हत्या. सोनिया गांधी आणि राहुल गांधी यांच्या प्रतिक्रिया या योगायोग आहेत, का प्रयोग! झालेल्या कालच्या घटनेची पाळंमुळं खणून काढायला मोदीजी आणि गृहमंत्री अमित शहा आणि त्यांचे संसदेतील सहकारी सक्षम आहेतच. माझाच नव्हे; तर आज देशाचा विश्वास मोदी यांच्यावर आहे. आपल्या तपास आणि सुरक्षा यंत्रणेवरही माझा पूर्ण विश्वास आहे. हा खरोखर बेरोजगारांचा आक्रोश होता, की षडयंत्र आहे हे देशासमोर आणतीलच हा माझा विश्वास आहे.

आपण भारतीय लोक खूपच संवेदनशील, भावनिक आहोत. जे समोर दिसतंय म्हणजे चॅनेलवर जे दाखवलं जातंय तेच आपण खरं मानून विचार करतो आणि आपलं मत बनवतो. चॅनेलवर सर्व खरं कधीच न दाखवता चॅनेलच्या सोयीनुसार दाखवलं जात नाही हेही तितकचं खरं आहे. चॅनेलवरच बघून आपण आपलं मत तयार करतो अन नंतर पश्चाताप करण्याची वेळ आपल्यावर येते. संसदेवरील सन २००१ सालचा हल्ला झाल्यानंतर आपण अवघ्या तीन वर्षांतच आपल्याला त्याचा विसर पडला. लोकसभेच्या २००४ च्या निवडणुकीत देशवासीयांनी कोणालाच स्पष्ट बहुमत दिलेलं नव्हतं. त्यामुळेच सोनिया गांधी यांनी अन्य पक्षांच्या मदतीने केंद्रातील सत्ता हस्तगत केली. त्यानंतर दहा वर्षे देशात कसा कारभार झाला, तो सर्वांनीच अनुभवला आहे. अगदी हिंदू अतिरेकी करण्यापर्यंत सोनिया गांधी यांच्या नेतृत्वाखालील सरकारने मजल मारली होती. धाडसी शहीद तुकाराम ओंबळे यांनी तसं घडू दिलं नाही.

सन २००४ ते २०१४ या काळात काँग्रेसच्या नेतृत्वाखाली केंद्रात सरकार असताना संसदेवर हल्ला कधीच झाला नाही. मात्र संसदेबाहेर अनेक ठिकाणी बॉम्बस्फोट झाले. मुंबईत लोकलमध्ये बॉम्बस्फोट, मुंबईवर २६ / ११ ला हल्ला झाला त्यावेळी केंद्रात अन राज्यात काँग्रेस व मित्रपक्षांचेच सरकार होते. देशाच्या इतर राज्यात अशाच काही घटना घडल्या होत्या, हे विसरुन चालणार नाही. आजही तशीच वेळ आहे. पंतप्रधान मोदी यांना भाजपाला सत्तेतून खाली खेचून पुन्हा सत्ता काबीज करण्यासाठी सोनिया गांधी, राहुल गांधी आणि प्रियांका वाड्रा हे साम, दाम, दंड, भेद सगळ्यांचा वापर करत आहेत. लोकसभेच्या निवडणुका तीन महिन्यांवर आलेल्या आहेत. त्यामुळे आता जे होणार आहे ते महाभारत असेल. महाभारत हे धर्मस्थापनेसाठीचे युद्ध होते. त्यात प्रत्येकाला एक पक्ष घ्यावाच लागतो. जो तटस्थ आहे, असे म्हणतो तो धर्माच्या विरुद्ध असतो असे भगवान श्रीकृष्णांनीच सांगितलं आहे.

स्व. वाजपेयी यांच्या वेळी लोकसभेच्या निवडणुका तीन वर्षांनी झालेल्या होत्या. आता तीन महिन्यांवर येऊन ठेपल्या आहेत. निकाल त्यावेळी जसा लागला तसा आताही लावायचा का? याचा निर्णय देशातील मतदारांनी करायचा आहे. सन २००४ साली काँग्रेसला सत्तेत बसवून त्यावेळी आपण आपल्या कुटुंबातील पुढच्या पिढीचे म्हणजे कुटुंबात त्यावेळी असलेल्या पंधरा वर्षांच्या वरील मुलांचे भविष्य कसे रंगवले हे आठवून बघा, आताच निर्णय घ्या. त्यासाठी संसदेवरील हल्ल्याची घटना पुरेशी बोलकी आहे! सन २००१ आणि २०२३ चा संसदेवरील हल्ला हे माझ्या मते तरी योगायोग नसून प्रयोगच आहेत. तुम्हाला काय वाटतं ?

**प्रा. डॉ. मेधा कुलकर्णी (माजी आमदार)**

स्वामीत्व, मुद्रक, प्रकाशक व संपादक खेमेंद्र हिरदीलाल कटरे यांनी बेरार टाईम्स हे साप्ताहिक वृत्तपत्र अंगपाल पारधी, लोकजन प्रकाशन, लोकजन भवन, स्नेह नगर, तकिया वॉर्ड, भंडारा ता.जि.भंडारा येथे मुद्रीत करुन डोलारे एजन्सीसमोरील रस्ता,शिवनगर गोंदिया येथे प्रकाशित केले. संपादक खेमेंद्र हिरदीलाल कटरे, भ्रमणध्वनी क्र. ८०८०८१५३२९ (पी.आर.बी. कायद्यानुसार जबाबदारी संपादकावर राहील) प्रसिद्ध झालेल्या मजकुराशी संपादक व प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. (गोंदिया न्यायकक्षेत)

# नारी शक्ती वंदन अधिनियम,अर्थात महिला आरक्षण:एक कोडे




देशातील सर्व लोकसभा आणि विधानसभांमध्ये महिलांना ३३ टक्के जागा आरक्षित करणारे हे विधेयक लोकसभा व राज्यसभेने एकमताने मंजूर केले. राष्ट्रपतीच्या सहीने त्याचे कायद्यात रूपांतर झाले. महिला आरक्षण विधेयक संसदेत पारित होत असताना, ज्यांनी महिला विधेयक आता आणले त्यांचे हेतू, मनसुबे, स्त्रियांबद्दल असलेले पौराणिक हीन विचार, मागासवर्गीय स्त्रियांवरील अन्याय यावरील सार्वत्रिक चर्चेतून अनेक प्रश्न उभे राहत असल्याचे दिसते. महिला सक्षमीकरणाच्या संकल्पनेतून सुरु झालेला, महिला आरक्षणाच्या मागणीचा इथपर्यंतचा प्रवास बघता सुमारे पंचवीस वर्षाच्या कालखंडात या विधेयकाला विरोधाचे व समर्थनाचे अनेक कंगोरे आहेत. खरंतर आरक्षणाचा मूळ हेतू समाजातील मागे पडलेल्या घटकांना मुख्यप्रवाहात आणण्यासाठी जाणीवपूर्वक संधी देण्याचा एक न्यायपूर्ण भाग होय. ज्यांच्यावर हजारो वर्षे अन्याय झाला अशा स्त्रिशुद्रातिशुद्र समाज घटकांना विकासाच्या संधी देणे सामाजिक न्यायाच्या दृष्टीने आणि लोकशाहीचा मूलाधार स्वातंत्र्य, समता, बंधुता या मूल्यांचे संवर्धनासाठी आवश्यक कसोटी ठरते. भारतीय समाजव्यवस्थेत अनेक विषमतामूलक तत्वे खरं तर या सामाजिक न्यायाच्या मूल्यांना छेद देणारी ठरली आहेत. त्यामुळे संविधानाच्या अंमलानंतर शैक्षणिक सामाजिक मागास घटकांना आरक्षणाची तरतूद करत असताना संघर्षपूर्ण वाटचाल राहिलेली आहे. अनुसूचित जाती-जमातीच्या आरक्षणानंतर ओबीसी आरक्षणाचा प्रश्न विशेषतः देशासमोर मआफ वासून उभा राहिला, पण त्याकडे गांभीर्याने लक्ष देण्यात आलेले नाही.

ओबीसी आरक्षणाचा गुंता उच्चजातहितसंबंधीयांच्या अनिच्छेमुळे सोडविला जात नाही. ओबीसींना लावलेला क्रीमिलेयर, ५०% आरक्षणाची मर्यादा, जातवार जनगणना इत्यादी प्रश्नांची न झालेली उकल ओबीसींच्या सामाजिक न्यायाच्या मार्गातील अडसर ठरत आहे. ओबीसी आरक्षणाची समस्या एकीकडे जटील करुन ठेवली त्याचा भडका देशभर पेटलेला असताना, ती आग तशीच पेटत ठेवून महिला आरक्षणाचा पुळका का आला? असा सवालही उभा ठाकणे रास्त आहे. त्यामुळे महिला आरक्षण विधेयक हे एक कोडेच ठरते. लोकसंख्येच्या निम्मे प्रमाण असलेल्या महिलांना शासकीय निर्णय प्रक्रियेत सहभागाची संधीच नाकारणे कोणत्याही देशात प्रगत समाजाचे दिवास्वप्न पाहणा?या देशासाठी कसे न्यायसंगत आणि व्यावहारिक दृष्ट्या योग्य ठरू शकेल?

महिला आरक्षण विधेयक अनपेक्षितपणे उचलून धरले असतानाच मणिपूर येथील उद्विग्नता आणि तेथे होणारे महिलांवरील अत्याचार या घटनांबद्दल मात्र चुप्पी कायम असते. या पार्श्वभूमिवर टीकेची झोड उठत आहे. मणिपुरमध्ये ज्या पद्धतीने नग्नधिंड काढून महिलांचा अपमान होतो, त्यावरुन ही टीका होणे स्वाभाविक आहे. त्याबद्दल जबाबदार यंत्रणा काहीच कसे करू शकत नाही? हा सवाल त्यानिमित्ताने विचारला जात आहे.

महिलांचा उदोउदो, अतिगौरविकरण करण्याच्या नादात पारित केलेले विधेयक एकीकडे संमत होत असताना या देशात जेव्हा देशाच्या अत्युच्च सन्मानाचे राजकीय प्रतीक असलेल्या नवनिर्मित संसद भवनाचे उद्घाटनप्रसंगी सर्वोच्चपदी असलेली राष्ट्रप्रमुख पदावरील व्यक्ती महिला असल्याने त्या ठिकाणी पाचारण केले जात नाही यावरून महिलांबद्दल असलेले बेगडी प्रेम उघड पडत आहे. ही घटना महिलांवरील अन्यायाला इतिहासकालीन संदर्भ प्राप्त करून देणारी आहे. या देशात चातुर्वर्ण्य व्यवस्थेत महिलांना अवर्ण म्हणून संभावना करुन महिलांशी अमानवीय व्यवहार केला गेला. प्राचीन भारतीय समाजात मातृसत्ताक पद्धतीचा पाडाव करुन स्त्रियांना हीन पातळीवर पोहचवण्यात आले. पुरुषप्रधान वैदिक आर्यसमाजाने अनेक क्रूर चालीरीतींच्या साहाय्याने या जमातीच्या जीवनातील मातृसत्ताकाचे माहात्म्य नष्ट करण्याचा प्रयत्न करून पाहिला. बालविवाह, बहुपत्नीकत्व, विधवांना दिली जाणारी अमानुष वागणूक आणि सतीची चाल या सर्वच गोष्टी या दृष्टीने उद्बोधक आहेत. स्त्रीच्या तुलनेने पुरुष हाच श्रेष्ठ आहे, ही पुरुषप्रधान समाजाची कल्पना येथील मातृसत्ताक-प्रभावित समाजमनावर बिंबण्यासाठी वैदिक आर्यपरंपरेत वाढलेल्या विचारवंतांनी या चाली रूढ केल्या. स्त्री-माहात्म्याचे अवमूल्यन करण्याचा इतका कठोर आणि आग्रही प्रयत्न जगात अन्यत्र कोठेही झालेला आढळत नाही. (पृ. ७१, लोकायत, स. रा. गाडगीळ, लोकवायय गृह, जानेवारी २०१३,) त्याचा पगडा भारतीय समाजावर आजही दिसत आहे. अनेक प्रसंगी धार्मिकस्थळी महिलांना प्रवेशास मज्जाव आहे. कित्येक ठिकाणी मंगलप्रसंगी महिलांना प्रवेश नाकारला जातो. नव्या संसदभवनाच्या उद्घाटनाच्या मंगलप्रसंगी देशाच्या महिला राष्ट्रप्रमुखास पाचारण न करणे ही बाब त्यामुळे गंभीर ठरते. अशा परिस्थितीत महिला विधेयक पारित करून त्याचा राजकारणी प्रचारकी फायदा घेण्याचा कावा उघडा पडतो.

महिलांवरील अत्याचाराचे सत्र या देशात सातत्याने चालू असते. लैंगिक शोषण, बलात्कार, खून, घरगुती हिंसा, कोवळ्या मुलींपासून तर वयोवृद्ध महिलांवरील अत्याचार ह्यांच्या संख्येत घट तर दिसतही नाही. महिलांचे श्रमिक शोषण, पितृसत्ताक व्यवस्थेचा भाग असलेल्या कुटुंबव्यवस्थेत, विवाह संस्थेत, धार्मिक संस्कार-विधींमध्ये, स्त्रियांना देण्यात येणारी दुय्यम वागणूक अशा कितीतरी स्त्रियांच्या समस्यांचीही गुंतागुंत येथील धर्मग्रंथाने, सामाजिक व्यवस्थेने करून ठेवली आहे. जन्मापासून मृत्यूपर्यंतच्या सर्व अवस्थांमध्ये स्त्रियांना पुरुषांपेक्षा हीन लेखले जाते, हे एक ऐतिहासिक सत्य आहे; परंतु हे काही पूर्ण सत्य नव्हे. कारण, जन्माच्याही आधीची गर्भावस्था आणि मृत्यूच्याही नंतरचे अंत्यसंस्कार यांच्या बाबतीत धर्मशास्त्रांनी केलेले नियमही स्त्रियांना हीन लेखणारेच आहेत. किंबहुना, गर्भावस्थेच्याही आधीची आईवडिलांच्या मनातील अपत्यप्राप्तीची इच्छा पाहिली आणि अंत्यसंस्कारानंतरचे पारलौकिक वा पुनर्जन्माने प्राप्त होणारे ऐहिक जीवन याविषयीच्या धारणा पाहिल्या, तरी स्त्रीविषयीचा तिरस्कार दिसून येतो. (पृ.११, हिंदू संस्कृती आणि स्त्री, ले. आ. ह. साळुंखे, लोकवायय गृह, डिसेंबर २०११) धर्मग्रंथाचा पगडा समाजमनावर घट्ट करणारे, त्यातच समाजाचं सुख असल्याचे सांगत असतात.नारी शक्तीला वंदन करण्याचा असा महिलांप्रति दिखाऊपणा करायचा, महिलांचे अद्भुत शक्तीच्या रुपात उदात्तीकरण करायचे नाहीतर तिला भोगवस्तुसमान ओरबाडून घ्यायचं अशी मूल्य सांगणारी व्यवस्था या देशात अजूनही मानगुटीवर बसलेली आहे. अशा अनेक बाबींचा सोक्षमोक्ष कसा लावायचा याची समाजाला चिंता आहे. मनुस्मृतीने स्त्रियांना दिलेली गुलामीची वागणूक तर कमालीची अन्यायकारक आहे. एकप्रकारे मनुस्मृतीने स्त्रियावरील अत्याचाराचा कळस केला. (पहाः मनुस्मृती अध्याय ५, श्लोक १५६ ते १६७ ; पंडित रामचंद्रशास्त्री अंबादास जोशी, प्रकाशकः ध.ह. सुरळकर, श्री गुरुदेव प्रकाशन, ७ रविवारपेठ, पुणे) त्या गुंतागुंतीची उकल नारी शक्ती वंदनच्या झगमगाटात कसे करणार? या अन्यायकारक आशयसंपन्न धर्मसूत्रांकडे कुणाचे कसे लक्ष जाऊ नये?

**ढोल गवार शुद्र पशू नारी
ये सब है ताडन के
अधिकारी**

हा कुविचार अजूनही उराशी बाळगून ब्रम्हहित साधणारे भामटे काही कमी नाही. महिलांसाठी न्यायोचित भूमिका घेण्यासाठी या देशात महिला आयोग स्थापन करण्यात आला,महिला कल्याण मंत्रालय कार्यरत आहे, त्या संस्था या तमाम बाबींकडे कसं बघतात? हेही महत्त्वाचे आहे.

जातीव्यवस्थेने समाजात पेरलेली विषमता अन्यायकारक आहे. त्या अन्यायाची तीव्रता कनिष्ठ जातीत अधिक आहे. खालच्या जातीवर जास्त अन्याय होत आलेला आहे. स्त्रियांच्या बाबतीतही हे सूत्र लागू पडते दलित, आदिवासी, भटक्या विमुक्त, ओबीसी महिलांवर होणारे अत्याचार व उच्चजातीय स्त्रियांवरील अत्याचार सर्वत्र सारखे दिसत नसतात. कनिष्ठ जातींच्या शोषणाची झळ स्त्रियांना अधिक पीडित करणारी आहे.

हे वास्तव मानणारा व मांडणारा एक मोठा अभ्यासक विचारवंत वर्ग या देशात आहे. एखाद्या उच्चजातीय महिलांवर अतिप्रसंग घडला तर मनिर्भयाफ प्रकरण होऊन त्याची सर्वत्र चर्चा होणे, आणि दररोज कुठे ना कुठे आदिवासी ओबीसी-कष्टकरी महिलांचे होणारे अत्याचाराचे सत्र कुणाच्याही कानी पडू नये? अशी येथील व्यवस्था असेल तर, प्रत्येक समाज घटक आपल्या सुरक्षेसाठी आरक्षणाची मागणी करण्यासाठी उभा टाकल्याशिवाय राहणार नाही. (अर्थात महिला कुठलाही कुठल्याही समाज हक्काची असो तरी असली तरी तिच्यावरील अत्याचार समर्थन अत्याचाराचे समर्थन होऊ शकत नाही.) महिला आरक्षणाचा विचार करत असताना त्यामुळेच अनुसूचित जाती जमातीच्या महिलांचा कोटा निश्चित करण्यात आलेला आहे. हाच प्रश्न ओबीसी महिलांच्या बाबतीत उजागर होत आहे. ओबीसी महिला सुद्धा उच्चजात महिलांपेक्षा अनेक बाबतीत मागास आहेत ओबीसी समाजाच्या मागासपणाचा विचार करत असताना, ओबीसी महिलांच्या मागासपणाचा विचारही करण्यात आलेला आहे. ओबीसी पुरुषांप्रमाणेच सांस्कृतिक, सामाजिक, राजकीय आर्थिक दृष्ट्या ओबीसी महिला कमालीच्या मागास आहेत, उच्चजातीय महिलांच्या स्पर्धेत ओबीसी महिला कशा टिकू शकतील? म्हणून महिला आरक्षणात ओबीसी महिलांना लोकसंख्येच्या प्रमाणामध्ये आरक्षण मिळावे म्हणून मागणी होत आहे. महिला आरक्षण विधेयक अनेक वर्षापासून थंड बस्त्यात पडले होते. त्यामागील कारणांपैकी ओबीसी महिलांना त्याअंतर्गत आरक्षणाची मागणी मान्य करत नसल्याने त्या विधेयकाला विरोध असणे, हे एक प्रमुख कारण होते. सुमारे २०-२५ वर्षांपूर्वी हे महिला विधेयक संसदेत मांडले असता त्यात ओबीसी महिलांच्या कोट्याची मागणी करत, विधेयकाच्या प्रति संसदेत समाजवादी पक्ष व राष्ट्रीय जनता दलाच्या लोकप्रतिनिधींनी फाडून टाकल्या होत्या. त्यामुळे ते बिल पारित होऊ शकले नव्हते. आणि त्यापश्चात महिला ओबीसीचा कोटा निश्चित केल्याशिवाय महिला आरक्षण विधेयक संसदेत सादर करण्याची हिंमतही झाली नाही.

मात्र घिसाडघाई करत आता हे विधेयक पारित करण्याचे सोपस्कार उरकण्यात आले. आजही संसदेत ओबीसी खासदारांची संख्या काही कमी नाही, पण मराजकीय एकचालकानुवर्ती वृत्ती आणि दंडेलशाही धोरणानुसार हे विधेयक श्रेयवादाच्या फंदात पारित करून घेतले. अशी होणारी टीका केवळ विरोधासाठी विरोध म्हणून नव्हे तर सत्ताधाऱ्यांची त्यामागील राजकीय गणितं अधिक स्पष्ट करणारी वाटते. नारी शक्ती वंदन कायदा अंमलबजावणीवर दाट सावट असताना, प्रत्यक्ष अंमलबजावणी करताना येणाऱ्या संभाव्य अडचणींची जाणीव असताना हे विधेयक पारित का करण्यात आले? यामागील खरी गोम समजली पाहिजे. महिला आरक्षणाला कोणाचाही विरोध असण्याचे कारण नाही. पण महिला विधेयक ज्या पद्धतीने पारित झाले त्याचा विचार करता महिला आरक्षण थंड बस्त्यातच राहील. कारण जी समाजव्यवस्था महिलांचा अनादर करते, महिलांना दुय्यम ठरवते, त्या व्यवस्थेच्या मुखंडाना महिलांना आरक्षण मिळावे असे वाटतच नाही. त्यामुळे नारी शक्ती विधेयक अर्थात, महिला आरक्षण विधेयक पारित करणे केवळ एक मृगजळ ठरावेत.

**अनुज हुलके**

## शिक्षक-कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित मागण्यांवर आमदार सुधाकर अडबाले यांनी शासनाचे लक्ष वेधले

**गोंदिया :** राज्यातील प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक व स्थानिक स्वराज्य संस्थांमधील कार्यरत/सेवानिवृत्त शिक्षक-कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित मागण्यांबाबत आमदार सुधाकर अडबाले यांनी शासनाचे लक्ष वेधले. हिवाळी अधिवेशनात विधान परिषदेत पुरवणी मागण्यांवर बोलताना त्यांनी सातव्या वेतन आयोगाचे हप्ते, डीसीपीएस/एनपीएस खाते नसलेल्या शिक्षकांचे सहाव्या वेतन आयोगाचे हप्ते, शिक्षकांना सेवानिवृत्तीनंतरचे प्रलंबित लाभ, वैद्यकीय देयके, आरटीई प्रतिपूर्ती शुल्क व इतर प्रलंबित विषय शासनाच्या निर्दशनास आणून दिले.



राज्यामध्ये सातवा वेतन आयोग लागू झाल्यानंतर तिसरा आणि चौथा हप्ता देण्याच्या संदर्भात वित्त विभागाचा दिनांक ९ मे २०२२ व २४ मे २०२३ च्या शासन निर्णय निर्गमित करण्यात आला. यानुसार राज्यातील इतर कर्मचाऱ्यांना तिसरा, चौथा हप्ता अदा करण्यात आला होता. मात्र, स्थानिक स्वराज्य संस्था व खाजगी अनुदानित शाळेतील शिक्षकांना दोन हप्ते मिळाले नव्हते. हिवाळी अधिवेशनात सातव्या वेतन आयोगाचे थकीत दोन हप्ते देण्याबाबत पुरवणी मागण्यांत तरतूद करण्यात आली. यासाठी अर्थमंत्री अजितदादा पवार यांचे आमदार अडबाले यांनी आभार मानले.सहाव्या वेतन आयोगाच्या थकबाकीच्या हप्त्याच्या संदर्भामध्ये जे कर्मचारी १ नोव्हेंबर २००५ पूर्वी लागले. परंतु, ज्यांनी डीसीपीएस किंवा एनपीएस खाते काढले नसेल अशा कर्मचाऱ्यांना अजूनही सहाव्या वेतन आयोगाच्या तिसरा, चौथा आणि पाचवा हप्ता देण्यात आलेला नाही. या संदर्भात पुरवणी मागण्यांमध्ये कुठलेही पुरवणी मागणी मंजूर करण्यात आलेली नाही. याबाबत आमदार अडबाले यांनी शासनाला गंभीरपणे विचार करण्याचे आवाहन केले.

कोरोना कालखंडानंतर सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांच्या संदर्भामध्ये सेवा विषयक लाभ मिळण्यास विलंब होत होता. दोन-दोन वर्षे होऊन सेवानिवृत्त झालेल्या कर्मचाऱ्यांना अंशराशीकरण उपदान, गटविमा, भविष्य निर्वाह निधीची रक्कम वेळेमध्ये मिळत नाही. या सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना सेवानिवृत्तीनंतरचे लाभ वेळेवर मिळण्यासाठी तरतूद करावी.

राज्यातील शिक्षक-शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचे आर्थिक वर्षापूर्वीचे थकीत देयके व वैद्यकीय देयके तात्काळ अदा करण्याच्या दृष्टीने कार्यवाही करावी, अशी मागणीही आमदार अडबाले यांनी केली.

आरटीई प्रतिपूर्ती शुल्काच्या संदर्भामध्ये बालकाचा मोफत व सक्तीचा अधिनियम कायदा २००९ नुसार २५% अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांना इंग्रजी माध्यमाच्या शाळेमध्ये प्रवेश देणे आणि त्याचे शुल्क केंद्राकडून ६० टक्के आणि राज्याकडून ४० टक्के प्रमाणे देण्याचे मान्य केलेले आहे मात्र, या संदर्भामध्ये मागील तीन-चार वर्षांपासून करोडो रुपये शासनाकडे प्रलंबित आहे. या पुरवणी मागण्यांमध्ये काही प्रमाणामध्ये देण्याचे मान्य केलेले आहे. परंतु, अजूनही यासंदर्भामध्ये पुरेशी तरतूद झाल्याचे दिसत नाही. याबाबतही शासनाने वेळेवर तरतूद करावी, अशी मागणी आमदार सुधाकर अडबाले यांनी सभागृहात केली.

## झाडीबोलीला अधिक समृद्धशाली करण्यासाठी कटीबद्ध : माजी मंत्री राजकुमार बडोले




**सडक अर्जुनी:** पुर्व विदर्भाच्या भंडारा, गोंदिया, गडचिरोली या भागातील शेकडो तलाव,मोठमोठी जंगले व नवेगावबांध,नागझीरा, ताडोबा या अभयारण्य व व्याघ्र प्रकल्पानी वेढलेल्या भागात बोलली जाणारी भाषा म्हणजे झाडीबोली. डॉ.प्रकाश आमटे, डॉ.अभय बंग,देवाजी तोफा डॉ.परशुराम खुणे असे अनेक समाज सेवक व झाडीपट्टीतील कलाकारांनी यात मानाचा तुरा खोवला आहे.तेव्हा आपल्या मायबोलीला अधिक समृद्धशाली करण्यासाठी मी कटीबद्ध आहे असे विचार माजी मंत्री इंजि.राजकुमार बडोले यांनी मांडले. तसेच संमेलनात मांडण्यात आलेल्या ठरावांना सरकार दरबारी पाठपुरावा करण्यात येईल असे सांगितले.

बोली महर्षी डॉ.हरीचंद्र बोरकर यांना गोंडवाना विद्यापीठाने डी.लीट ही मानद देऊन सन्मान करावा, गोंदिया चंद्रपूर रेल्वेला झाडीपट्टी एक्स्प्रेस नाव शासनाने द्यावे,वर्ग ५ते ८ या वर्गात स्थानिक बोलींचा संयुक्त अभ्यासक्रम शिकवावा इत्यादी ठरावांना पाठपुरावा करण्याचे आश्वासन माजी मंत्री बडोलेनी दिले.

बाम्हणी/खडकी ता. सडक अर्जुनी येथे झाडीबोली साहित्य मंडळ साकोली व झाडीबोली साहित्य मंडळ शाखा बाम्हणी/खडकी यांच्या संयुक्त विद्यमाने ३१ व्या झाडीबोली साहित्य संमेलनाच्या समारोपीय कार्यक्रमाप्रसंगी माजी मंत्री राजकुमार बडोले बोलत होते.

याप्रसंगी संमेलनाध्यक्ष डॉ. चंद्रकात लेनगुरे,कवयित्री अंजणाबाई खुणे,जिल्हा परिषद सदस्य चंद्रकला डोंगरवार,पंचायत समिती सदस्य दिपाली मेश्राम,संरपच विलास वट्टी,अनिल दोनोडे,मयुर रामटेके,संरपच राजेंद्र राऊत,संरपचा शर्मिला चिमणकार,सुरेश बोरकर,ताराचंद कापगते,डोमा कापगते आदि मान्यवर उपस्थित होते.

# शासकीय योजना घरोघरी नेणारी संकल्प यात्रा

भारत सरकारच्या महत्वाकांक्षी योजनांचा लाभ लक्ष्यित लाभार्थ्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी "विकसित भारत संकल्प यात्रा' ही मोहिम १५ नोव्हेंबरपासून सुरू करण्यात आली आहे. मोहिमेअंतर्गत केंद्र शासनाच्या योजनांची माहिती देणारा चित्ररथ जिल्ह्यातील ग्रामीण आणि शहरी भागात फिरविला जात असून त्या लाभार्थ्यापर्यंत पोहोचण्याचा यशस्वी प्रयत्न होत आहे. जनजाती गौरव दिनापासून सुरू झालेली ही यात्रा पहिल्या टप्प्यात लक्षणीय अनुसूचित जमाती लोकसंख्या असलेल्या देशातील ११० जिल्ह्यात सुरू करण्यात आली. त्यानंतर नोव्हेंबरच्या तिसऱ्या आठवड्यापासून उर्वरीत सर्व जिल्ह्यात यात्रा सुरू करण्यात आली असून २६ जानेवारी २०२४ पर्यंत देशातील सर्व भागात पोहोचणार आहे. यात्रेच्या निमित्ताने लाभार्थ्यांशी संवाद देखील साधण्यात येत आहे.

ग्रामीण भागात आयुष्मान भारत, प्रधानमंत्री गरीब कल्याण योजना, राष्ट्रीय ग्रामीण जीवनोन्नती अभियान, प्रधानमंत्री आवास योजना, उज्ज्वला योजना, पीएम विश्वकर्मा योजना, प्रधानमंत्री किसान सन्मान योजना, किसान क्रेडीट कार्ड, प्रधानमंत्री पोषण अभियान, हर घर जल-जलजीवन मिशन, जन धन योजना, जीवन ज्योती विमा योजना, सुरक्षा विमा योजना, अटल पेन्शन योजना, नमो फर्टीलायझर या योजनांबाबत माहिती देण्यात येत आहे.

आदिवासी भागासाठी सिकलसेल नोनिमिया निर्मुलन कार्यक्रम, एकलव्य निवासी शाळेत प्रवेश, शिष्यवृत्ती योजना, वन धन विकास केंद्र आदींबाबतही जनजागृती करण्यात येत आहे. तर शहरी भागात प्रधानमंत्री स्वनिधी योजना, पीएम विश्वकर्मा योजना, आयुष्मान भारत, उज्ज्वला योजना, मुद्रा कर्ज, स्वच्छ भारत अभियान (शहरी), पीएम आवास योजना, पीएम ई-बस सेवा, खेलो इंडिया, सौभाग्य योजना, वंदे भारत रेल्वे, उडान आदी विविध योजनांच्या जनजागृतीवर भर देण्यात येत आहे.




माहिती प्रसाराद्वारे शासकीय योजनांबाबत जागरुकता निर्माण करण्यासोबतच संभाव्य लाभार्थ्यांची नोंदणीदेखील यात्रेदरम्यान होत असल्याने या यात्रेला नागरिकांचा चांगला प्रतिसाद मिळतो आहे. विविध योजनांची माहिती देणारा दृकश्राव्य माध्यमाने सज्ज चित्ररथ या यात्रेचे प्रमुख आकर्षण आहे. दृकश्राव्य माध्यमाद्वारे नागरिकांशी संवाद साधतांना त्यांना विविध योजनांची माहिती देणा?या हस्तपत्रकांचे आणि कॅलेंडरचे वाटपही करण्यात येत आहे. यात्रेदरम्यान प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचा संदेशही दाखविण्यात येत आहे. यात्रेला भेट देणारे नागरिक शपथ घेऊन विकसित भारतासाठी संकल्प करीत आहेत.

शेतकऱ्यांसाठी ड्रोन प्रात्यक्षिक आणि नैसर्गिक शेती व मृदा आरोग्य पत्रिकेवरील चर्चा ग्रामीण भागासाठी उपयुक्त ठरत आहे. स्थानिक पातळीवर यश संपादन केलेल्या महिला आणि खेळाडूंचा सत्कार हे देखील या यात्रेचे वेगळे वैशिष्ट्य आहे. यात्रेदरम्यान आरोग्य शिबिराच्या माध्यमातून आरोग्य तपासणी आणि किसान क्रेडीट कार्ड नोंदणी करण्यात येत आहे. आतापर्यंत जिल्ह्यातील तिरोडा, गोरेगाव, सडक अर्जुनी व अर्जुनी मोरगाव उपविभागातील १३२ ग्रामपंचायतीत हा चित्ररथ पोहोचला असून ११०४५ नागरिकांनी विविध योजनांची माहिती घेतली. त्याचप्रमाणे ७८०० नागरिकांनी योजनांचा लाभ घेण्याचा संकल्प केला. नोव्हेंबरच्या तिसऱ्या आठवड्यापासून गोंदिया जिल्ह्यात यात्रा सुरूकरण्यात आली असून २६ जानेवारी २०२४ पर्यंत जिल्ह्यातील ५४७ ग्रामपंचायतमध्ये पोहोचणार आहे. यात्रेच्या निमित्ताने लाभार्थ्यांशी संवाद देखील साधण्यात येत आहे. केंद्र सरकारच्या महत्वाकांक्षी योजनांची माहिती नागरिक मोठ्या संख्येने जाणून घेत आहेत.

जिल्ह्यात आतापर्यंत दीडशेपेक्षा अधिक ग्रामपंचायतीमध्ये ही यात्रा पोहोचली. नागरिकांचा यात्रेला चांगला प्रतिसाद असून आतापर्यंत पंधरा हजारांहून अधिक नागरिकांनी यात्रेला भेट दिली. नागरिकांना विविध योजनांचा लाभ देखील देण्यात आला. या यात्रेला भेट देऊन शासकीय योजनांचा लाभ घेण्याचे आवाहन प्रशासनातर्फे करण्यात आले आहे. देशाच्या विकासाचा संकल्प घेऊन ही यात्रा आपल्या दारापर्यंत येत आहे. आपणही यात्रेचा लाभ घेण्यासाठी अवश्य भेट द्या !

**- के. के. गजभिये,**
उपसंपादक, जिल्हा माहिती कार्यालय, गोंदिया

# जिल्हा विकास आराखडा तयार करण्यासाठी कृती आराखडा तात्काळ सादर करा-जिल्हाधिकारी

**गोंदिया:** राज्याच्या अर्थव्यवस्थेस चालना देण्यासाठी व पर्यायाने विकसित भारतामध्ये आपल्या राज्याचा वाटा सर्वाधिक असावा या दृष्टीने जिल्ह्यास केंद्रस्थानी ठेवून विशिष्ट नियोजन करण्याची आवश्यकता आहे. जिल्हा विकास आराखडा हा विकसीत भारताची संकल्पना पुर्ण करण्यासाठी आहे. त्यामुळे जिल्हा विकास आराखड्याचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी सर्व यंत्रणांनी सन २०२८ पर्यंतचा वर्षनिहाय आराखडा तयार करुन त्यानंतर ५ वर्षाकरीता एकत्रित कृती आराखडा तात्काळ सादर करावे, असे निर्देश जिल्हाधिकारी चिन्मय गोतमारे यांनी येथे दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयाच्या सभागृहात आयोजित जिल्हा विकास आराखडा जिल्हास्तरीय कार्यकारी समितीच्या सभेत अध्यक्षस्थानावरुन श्री. गोतमारे बोलत होते. यावेळी निवासी उपजिल्हाधिकारी स्मिता बेलपत्रे, जिल्हा नियोजन अधिकारी सुनिल धोंगडे यांचेसह विविध विभागाचे प्रमुख अधिकारी उपस्थित होते.



जिल्हाधिकारी श्री. गोतमारे म्हणाले, जिल्हा विकास आराखडा तयार करतांना जिल्ह्यातील विकासाची क्षेत्र व नविन उदयास येणारी क्षेत्र/उपक्षेत्र यांच्या वाढीसाठी व पर्यायाने जिल्ह्याच्या विकासास चालना मिळावी यासाठी प्रयत्न करण्यासंदर्भातील बाबींचा कृती आराखड्यात समावेश करण्यात यावा आणि विहीत नमुन्यातच आराखडा तयार करुन सादर करण्याबाबत निर्देश दिले.

सदर आराखडा तयार करतांना आपल्या क्षेत्रामध्ये विकसीत व अविकसीत तालुक्यांचा, त्यामधील लोकसंख्येचा, रोजगार निर्मिती करण्यासाठी व जिल्ह्याचे उत्पन्न वाढविण्यासाठी सर्वकष होण्याच्या दृष्टीकोनातून सर्व सम ावेशक विचार करुन सर्व यंत्रणांनी त्यांचा विभागनिहाय डेटा शीट, क्षेत्र आणि उपक्षेत्रांचे SWOT विश्लेषण, व्हिजन, मिशन, विभागाच्या अंतर्गत उपक्षेत्रांची ओळख, स्वरुपानुसार प्रत्येक वर्ष (वार्षिक) आणि ५ वर्षांसाठी कृती आराखडा तयार करण्यात यावा. हा आराखडा तयार करतांना प्रथम उद्दिष्ट निश्चित करुन ते साध्य करण्यासाठी लागणारा कालावधी, निधी तसेच शासन स्तरावरुन आणखी कोणत्या प्रकारची मदत मिळणे अपेक्षित आहे हे नमूद करणे गरजेचे आहे असे त्यांनी यावेळी सांगितले.

जिल्हा विकास कृती आराखड्याबाबत आतापर्यंत जवळपास १८ विभागानी आपआपल्या कार्यालयाच्या माहितीचे सादरीकरण केले. सदर माहिती शासनास तात्काळ सादर करावयाची असल्याने उर्वरित विभागांनी सदर माहिती तातडीने नियोजन विभागास सादर करावी असे निर्देश जिल्हाधिकारी यांनी दिले.

# सेजगाव येथील जि.प.शाळेला रिक्त पदाचे लागले ग्रहण

**गोंदिया :** आधुनिक तंत्रज्ञानाच्या युगात आ-पली शाळा कुठेही मागे पडू नये, यासाठी जिल्हा परिषदेच्या वतिने दशकापासून केंद्र व राज्य शासनाच्या विविध योजनांच्या माध्यमातून शाळांचा दर्जा उंचाविण्यात येत आहे. गोंदिया जिल्ह्यातील अनेक शाळांनी कात टाकली, त्यातच तिरोडा तालुक्यातील सेजगाव येथील जिल्हा परिषद वरिष्ठ माध्यमिक शाळेने सुद्धा भरारी घेतली. शाळेतील परिसर वर्ग खोल्या, लोकांचा सहभाग व शिक्षकांची मेहनत यामुळे गावातील खाजगी शाळेला अवकळा येत जि.प. शाळेने उत्तरोत्तर प्रगती साधली. मात्र या प्रगतीला आता रिक्त पदाचे ग्रहण लागले आहे.

मागील दशकापासून जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागामार्फत गावची शाळा-आमची शाळा, आदर्श शाळा अभियान, डीजिटल शाळा यासह विविध उपक्रम जिल्हा परिषदेच्या शाळेत राबविण्याला सुरुवात करण्यात आली. केंद्र व राज्य शासनाने सुरू केलेल्या अनेक योजनांचा लाभ जि.प.च्या शाळा घेवू लागल्याने त्यांचा दर्जाही उंचावू लागला. बघता बघता अनेक शाळांनी ग्रामीण भागातील नामांकीत खाजगी शाळांनाही मागे टाकत पटसंख्येसह शाळेचा नाव लौकिक केला. मात्र मागील काही वर्षापासून चांगल्या गुणवत्ता प्राप्त शाळांना रिक्त पदाचे ग्रहण लागले आहे.



### अतिरिक्त प्रभाराचा बोझा

**सजेगाव येथील शाळेत पुर्व सरपंच कंठीलाल पारधी तसेच वर्तमान सरपंचासह सर्व ग्रामपंचायत सदस्य व गावातील विविध संघटनांच्या पदाधिकाऱ्यांकडून शाळेचा दर्जा उंचाविण्याचा प्रयत्न करण्यात आला. मात्र मुख्याध्यापकाचे पदही प्रभारी असून विषय शिक्षक (गणित) व दोन सहाय्यक शिक्षक अशी पदे रिक्त आहे. त्यामुळे शिक्षकावर अतिरिक्त प्रभारासह बोझा वाढला आहे. यासाठी शिक्षण विभागाने त्वरित शाळेचा दर्जा टिकविण्यासाठी शिक्षकांची भरती करावी.**

**- सुरेश पटले, प्रभारी मुख्याध्यापक, जि.प.शाळा सेजगाव**

**शाळेत संगणक कक्षासह शालेय क्रीडांगण व इतर सोयीसुविधा आहेत. मात्र विद्यार्थ्यांना या सोयीसुविधांचा लाभ देण्यासाठी शिक्षक नसल्याने या सुविधा व साहित्य धुळखात पडून आहेत. तेव्हा शिक्षण विभागाने त्वरित पदभरती करुन विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक दर्जा वाढविण्यासाठी प्रयत्न करावे.**

**सौ. उषा अरुण कठाणे, सरपंच, ग्रा.पं.सेजगाव**

विशेष म्हणजे या शाळांना चांगला दर्जा देण्यासाठी लोकसहभागही मोठ्या प्रमाणात लाभला. तिरोडा तालुक्यातील सेजगाव येथील जिल्हा परिषद वरिष्ठ प्राथमिक शाळेत वर्ग पहली ते आठवीपर्यंत शिक्षणाची सोय आहे. शाळेत १९४ मुले आजघडीला शिक्षणाचे धडे गिरवित आहेत. मात्र आठ वर्गांना सांभाळण्यासाठी फक्त चारच शिक्षक कार्यरत आहेत. चार शिक्षकांचा बॅकलॉग शिल्लक असल्याने कात टाकलेल्या या शाळेला रिक्त पदाचे ग्रहण लागल्याने हळुहळु दर्जा खालविण्याची स्थितीही निर्माण झाली आहे. लोकांनी सहभागातून शाळा वाचविण्यासाठी केलेल्या प्रयत्नांना शिक्षण विभाग आडकाठी आणत असल्याचा आरोपही आता होऊ लागला आहे. एकंदरीत ग्राम ीण भागातील जिल्हा परिषदेच्या शाळा टिकविण्यासाठी रिक्तपदी त्वरित शिक्षकांची भर्ती करण्यात यावी, तेव्हाच कुठे शाळेचा दर्जा टिकविण्यास मदत होईल.

# अवैध वृक्षतोडीमुळे पर्यावरण धोक्यात

## शासकीय वनजमिनीवरही अतिक्रमण: वनविभागाची बघ्याची भूमिका



**सडक अर्जुनी:** वनसंपदेने नटलेला गोंदिया जिल्हा आहे. सडक अर्जुनी तालुक्यात मोठ्या प्रमाणात वनसंपदा आहे. मात्र या वनसंपदेचे जतन व संरक्षण करण्यास वनविभाग अपयशी पडल्याचे चित्र आहे. या अवैध वृक्षतोडीला वनविभागातील काही अधिकारी व कर्मचाऱ्यांचे पाठबळ असल्याने हा प्रकार राजरोसपणे सुरू आहे. या अवैध वृक्षतोडीमुळे पर्यावरण धोक्यात आले आहे. सागवन वृक्षाची कत्तल होत असताना वनविभाग गप्प का? यावरुन हा विषयसमोर आला आहे.

सडक अर्जुनी वनपरिक्षेत्राला लागून नवेगाव-नागझीरा अभयारण्य असल्यामुळे बफर झोन क्षेत्रातून वृक्षतोड करता येत नाही. तरीपण राजरोसपणे या वनपरिक्षेत्रातून अवैध वृक्षतोड सुरुच आहे. यामुळे जंगले नष्ट होण्याच्या मार्गावर आहेत. हा सर्व प्रकार अधिकारी व कर्मचाऱ्याच्या संगनमताने होत असून जंगलातील वारेमाप वृक्षतोड झाल्याने जंगल नष्ट होत चालले आहे. जिल्ह्यातील गोंदिया वनविभाग उपवनसंरक्षक कार्यालयांतर्गत वनपरिक्षेत्र कार्यालय सडक अर्जुनी अंतर्गत मागील दोन वर्षांपासून मौल्यवान सागवन वृक्ष व वनजमिनीवर अतिक्रमण होत आहे. यात वनसंपत्तीने नुकसान होत आहे. हा सर्व प्रकार वरिष्ठ वन अधिकाऱ्यांच्या मुकसंमतीने होत असल्याचा आरोप होत आहे. सडक अर्जुनी वनपरिक्षेत्रातील अवैध वृक्षतोड व वन जमिनीवरील अतिक्रमणाबाबत अनेकदा पुराव्यासह तक्रार केली. मात्र, या प्रकरणी वरिष्ठ वन अधिकाऱ्यांनी कारवाई न केल्याने सामाजिक कार्यकर्ते भामा चुऱ्हे यांनी या प्रकरणाची तक्रार दोन वेळा वनमंत्र्याकडे केली. त्यानंतर प्रादेशिक वनसंरक्षक ए.लक्ष्मी यांना तक्रार केली.

या तक्रारीची दखल घेऊन विभागीय वन अधिकारी (दक्षता) नागपूर विभाग नागपूर यांनी चौकशी समिती म्हणून नियुक्त केली. त्यानुसार २५ जुलै रोजी कोडापे विभागीय वन अधिकाऱ्यांनी या चौकशीसाठी भंडारा वनविभागातील नपरिक्षेत्राधिकारी मेंढे, गोंदिया वनविभागातील वनपरिक्षेत्र अधिकारी भगत व नवेगाव येथील वनपरिक्षेत्र अधिकारी कटरे यांनी वनपरिक्षेत्र कार्यालय कोहमारा (सडक अर्जुनी) कार्यालयात बसून चौकशी केल्याची वनकर्मचाऱ्यांमध्ये चर्चा आहे.

गोंदिया वनविभागातील वनपरिक्षेत्र कोहमारा (सडक अर्जुनी) कार्यक्षेत्रात वनतस्करांनी वन अधिकाऱ्यांच्या संगनमताने मागील दोन वर्षांपासून राखीव वनसंरक्षित वनातील जा-गेवर अतिक्रमण करुन मौल्यवान सागवन वृक्षाची कत्तल करुन वृक्षतोड केली. याबाबत वनमंत्री, प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख) यांना तक्रार केली. पण दोषी अधिकाऱ्यांवर कार्यवाही न झाल्याने सदर प्रकरण ए.लक्ष्मी वनसंरक्षक वनवृत्त नागपूर यांना दखल घ्यावी लागली. त्या जबाबदार वन अधिकाऱ्यांवर योग्य कारवाई होईल अशी अपेक्षा आहे.

### तक्रारीची थातुरमातुर चौकशी

**सहवनक्षेत्र जांभळी डव्वा गट नं.४६७८११ या कंम्पार्टमेंट मधील अतिक्रमण, सहवनक्षेत्र कोहमारा क्षेत्रातील गट नं.११८८ मधील सा-गवन रोपवनात टी.सी.एम. नाली बूजवून व रोपवनातील सागवन झाडे मुळासकट उपटून रोपवनात १५० मीटर आत अतिक्रमण करुन सिमेंट क्राँक्रिटची व्यवसाय करणञयासाठी मजबूत दुकाने थाटणे, दल्ली बिटात उभे ५२ सागवन झाडे ४ ते ५ फुट गोलाईच्या झाडांची कत्तल केली. ही ५२ सागवन झाडे वादळ वाऱ्याने पडल्याचे वनपरिक्षेत्र अधिकाऱ्यांनी सांगून त्या झाडाची विल्हेवाट लावून गौडबंगाल केले. आजही मोक्यावर कापलेल्या झाडांच्या थुटावर फुटवे निघालेले आहेत. जि.प. प्राथमिक शाळा बाम्हणी (खडकी) येथे सागवन वृक्षतोड २०२१ मध्ये तत्कालीन वनपरिक्षेत्र अधिकारी सुरेश पाचभाई व सहायक वनसंरक्षक पाटील यांनी मे जून २०२१ मध्ये मोक्यावर ४० एकर अतिक्रमण हवून त्याजागी मिश्र रोपवन लावले होते. पण वनपरिक्षेत्र अधिकाऱ्यांनी कोहमारा (सडक अर्जुनी) वनपरिक्षेत्र कार्यालयात रूजू होताच रोपवन लावलेल्या जागेवर अतिक्रमण करण्यास मुकसंमती दिली. शेंडा, रेंगेपार येथील ठेकेदारांना सोबत घेऊन वृक्षतोड केली. या सर्व प्रकरणाची तक्रार केल्यानंतर या प्रकरणाची चौकशी सहा महिन्यानंतर सालेकसा वनपरिक्षेत्राधिकाऱ्यांनी से सध्या सहायक उपवनसंरक्षक गोंदियाचे पदभार सांभाळत असून यांनी १० ऑक्टोबरला वरील प्रकरणाची चौकशी कार्यालयात बसून खोटे बयान नोंदवून थातूरमातूर चौकशी केल्याचा आरोप भामा चुऱ्हे यांनी केला.**

## हत्तीच्या कळपावर ड्रोन कॅमेरासह नियंत्रण पथकाची नजर

अर्जुनी मोर. -गेल्या आठवड्याभरात गडचिरोली जिल्ह्यातील जंगलातून जंगली हत्तींनी तालुक्यातील जंगलात कहर सुरू केला आहे. या भागात आठ दिवसापासून जंगली हत्तीचा वावर आहे. त्यामुळे परिसरातील नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण आहे. ड्रोन कॅमेराद्वारे हत्तीच्या कळपाची माहिती ठेवली जात आहे. या हत्तीवर नियंत्रण ठेवण्यासाठी बंगालमधून तज्ञा-ची टीमही पाचारण केली आहे. आतापर्यंत हत्तीच्या कळपाने लाखोचे पीक उध्वस्त केले आहे.

२०२२ च्या दिवाळीच्या दोन दिवस आधी हत्तीच्या कडपा ने नागणडोह येथील वस्ती उध्वस्त केली होती. हत्तीच्या हल्ल्यात एका शेतकऱ्याचा ही मृत्यू झाला होता. जंगली हत्तीच्या कडपा ने कोट्यावधी रुपयाच्या पिकाचे व वन विभागाच्या मालमत्तेचे नुकसान केले होते. त्यानंतर हत्तीचा कळप गडचिरोली जिल्ह्याच्या दिशेने गेला होता. मात्र जुलै २०२३ मध्ये पुन्हा गोंदिया जिल्ह्यात परतला.आणि काही दिवस नवेगावबांध राष्ट्रीय उद्यानातील जंगलात राहिल्यानंतर हा कळप पुन्हा गडचिरोली जिल्ह्याच्या दिशेने गेला पुन्हा चार महिन्यांनी ११ डिसेंबर रोजी गोंदिया जिल्ह्यात प्रवेश केल्यानंतर अर्जुनी मोरगाव तालुक्यातील राजोली /भरनोली ,बाराभाटी,व रामघाट येथील शेतपिके व घरादांराचे नुकसान करुन कहर करण्यास सुरुवात केली. या जंगली हत्तीवर नियंत्रण ठेवण्यासाठी वन विभागाने बंगालमधून हत्ती नियंत्रण तज्ञांची टीम पाचारण केली आहे.

## राष्ट्रवादी काँग्रेसच्या जिल्हाध्यक्षपदी प्रेमकुमार रहांगडाले, तर परशुरामकर प्रदेश सरचिटणीस



**गोंदिया:** राष्ट्रवादीकाँग्रेस पाटी(अजीत पवार गट)चे राष्ट्रीय कार्याध्यक्ष खा.प्रफुल पटेल,राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निर्देशानुसार प्रदेशाध्यक्ष खा.सुनील तटकरे यांच्या आदेशाने गोंदिया जिल्हाध्यक्षपदी माजी जिल्हा परिषद सदस्य प्रेमकुमार रहांगडाले यांची तर गंगाधर परशुरामकर यांची महाराष्ट्र प्रदेश राष्ट्रवादी काँग्रेसच्या सरचिटणीस पदी नियुक्ती करण्यात आली. सोबतच श्री परशुरामकर यांना गडचिरोली निरक्षक म्हणुन पदभार देण्यात आला.

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी कार्यालय, रेलटोली येथे राष्ट्रीय सचिव व माजी आमदार राजेंद्र जैन यांच्या हस्ते नियुक्ती पत्र देण्यात आले. श्री जैन यांनी नवनियुक्त सरचिटणीस व जिल्हाध्यक्ष यांना पुढील वाटचालीच्या शूभेच्छा दिल्या. यावेळी राजेंद्र जैन, गंगाधर परश-ुरामकर, प्रेमकुमार रहांगगडाले, राजलक्ष्मी तुरकर, सुरेश हर्षे, यशवंत गणवीर, किशोर तरोने, केतन तुरकर, यशवंत परशुरामकर, करण टेकाम दिलीप डोंगरे, राजेश तायवाडे, सुनील पटले शैलेश वासनिक, प्रतीक पारधी, शरभ मिश्रा, वामन गेडाम सहीत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी उपस्थित होते.

## ६ जानेवारी पर्यत जिल्ह्यात मनाई आदेश लागू

**गोंदिया :** पोलीस अधीक्षक गोंदिया कार्यालयाचे १८ डिसेंबर २०२३ चे पत्रानुसार दिनांक २३ डिसेंबर २०२३ ते ०६ जानेवारी २०२४ या कालावधीत जिल्ह्यात विविध पक्ष व संघटनांकडून त्यांच्या प्रलंबीत मागण्या संदर्भाने उपो-षणे, धरणे, मोर्चे, रास्तो रोको, जेल भरो व संप इत्यादी आंदोलने आयोजित केली जात आहेत. तसेच २५ डिसेंबरला ख्रिसमस (नाताळ) हा सण मोठ्या उत्साहात साजरा करण्यात येणार आहे. त्याचप्रमाणे नुतन वर्ष आगमन दृष्टिकोनातून जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्याच्या दृष्टीने अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी, गोंदिया यांना प्राप्त अधिकाराअंतर्गत सन १९५१ च्या मुंबई पोलीस अधिनियम क्रमांक २२ चे कलम ३७ (१) (३) अन्वये दिनांक २३ डिसेंबर २०२३ पासून ते ०६ जानेवारी २०२४ पर्यत अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी स्मिता बेलपत्रे यांनी जिल्ह्यात मनाई आदेश लागू केले आहे.

## अदानी प्रकल्पाचा कोळसा विकून पुरविले दगड, गिट्टी ट्रकचालकांचा प्रताप

**गोंदिया- :** कोळसा विकून त्या ऐवजी माती व गिट्टी पुरवून अदानी विज प्रकल्प व्यवस्थापनाला दोन ट्रकचालकांनी गंडा घातल्याचा प्रकार गुरूवार १४ डिसेंबर रोजी संध्याकाळच्या सुमारास उघडकीस आला आहे.रोहित पांडे (२२) रा. खडबडा, सोनवर्षा (मध्यप्रदेश) व घरभरण जगन्नाथ यादव (५८), रा. २०९ वरुन आर्केट नियर लॉकिंग, इंडस्ट्रीज (ठाणे पश्चिम) अशी गुन्हा दाखल झालेल्या आरोपींची नावे आहेत.

तिरोडा येथील महाराष्ट्र राज्य औद्योगिक विकास महामंडळाच्या क्षेत्रात अदानी वीज प्रकल्पामध्ये दगडी कोळसा पोहोचविण्यासाठी ट्रक क्रमांक एमएच ४० सीपी ३०११ मध्ये १ लाख ६ हजार १६३ रुपये किमतीचा ३६ टन ३६० किलो कोळसा व ट्रक क्रमांक एमएच ४० डीएल ५०६२ मध्ये ७० हजार ३५५ रूपये किमतीचा २६ टन २४० किलो कोळसा असा ६२ टन ६०० किलो दगडी कोळसा पाठविण्यात आला होता.

ट्रकचालक रोहित पांडे व घरभरण यादव यांनी ट्रकमधील कोळसा विकून त्या ऐवजी माती, दगड व गिट्टी भरुन अदानी वीज प्रकल्पाला पुरविले. हा प्रकार उघडकीस आल्याने फिर्यादी विनोद सुखदेव चव्हाण (५१), रा. तिरोडा यांच्या तक्रारीवरून तिरोडा पोलिसांनी दोन्ही ट्रकचालकांवर भादंविच्या कलम ४०८, ४०६, ३४ अन्वये गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास पोलिस उपनिरीक्षक दलालवाड करीत आहेत.

# कृषी साहित्य वाटपाची चौकशी करुन दोषींवर फौजदारी कारवाई करा

**गोंदिया:** मानव विकास कार्यक्रमांतर्गत रोजगार निर्मिती विषयक योजना राबवित असताना लाभार्थी संख्या वाढल्याने विशेष निधी म्हणून कृषी अवजारे, यंत्र शेतकरी, महिला गट यांना अनुद-ानावर देण्यासाठी २० कोटी रुपये मंजूर करण्यात आले. मात्र या प्रकरणात जिल्ह्यातील तत्कालीन दोन व्यक्तींनी सत्तेचा गैरवापर करीत स्वमर्जीतील शेतकऱ्यांची शेतकरी उत्पादक कंपनी व बचत गट स्थापन करुन साहित्य वाटप केले. त्यामुळे या प्रकरणाची चौकशी करुन दोषी आढळणाऱ्या अधिकारी, कर्मचाऱ्यांसह संबंधित व्यक्ती विरो-धात फौजदारी कारवाई करण्याची मागणी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरद पवार गट) कार्याध्यक्ष मिथून मेश्राम यांनी सोमवारी (दि.११) येथे आयोजित पत्रकार परिषदेत केली.

स्थानिक विश्रामगृहात आयोजित पत्रकार परिषदेला जिल्हाध्यक्ष सौरभ रोकडे, दिनेश कोरे, प्रतीक लांजेवार, सोनू डहाट यासह पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते. मिथुन मेश्राम यांनी माहिती देताना सन २०२२-२३ मध्ये गोंदिया जिल्ह्यात मानव विकास योजनेंतर्गत शेतकरी व महिला बचत गटांना अनुदान तत्वावर नाविन्यपूर्ण साहित्यांचे वाटप करायचे होते. साहित्य वाटप करताना या योजनेसाठी लाभार्थीकडून अर्ज मागविण्यासाठी संबंधित जहिरात



नामांकित वृत्तपत्रातून प्रकाशित करणे क्रमप्राप्त होते. पात्र लाभार्थीची निवड करताना लॉटरी गुणानुक्रम किंवा तत्सम पद्धत वापरुन पारदर्शकता आणणे आवश्यक होते. या योजनेची जाहिरात अ वर्ग दैनिकात प्रकाशित करण्यात आली नसून कृषी अवजारे वाटपात मोठ्या प्रमाणात अनियमितता झाल्याचा आरोप केला आहे.

### कृषी साहित्य दिली दामदुप्पट दराने

**या योजनेंतर्गत वाटप करण्यात आलेले ट्रॅक्टर, ट्रॉली, मळणी यंत्र, कॅचबिल, रोटावेटर इत्यादी कृषी अवजारे नावीन्यपूर्ण होऊच शकत नसल्याचे ते म्हणाले. भारतीय कृषी अवजारे निरीक्षण करणारी संस्था बुधनीच्या निर्देशानुसार कृषी अवजारे पुरविण्यात आली नाहीत. या योजनेमध्ये वाटप करण्यात आलेली कृषी साहित्य अवजारे १ लाख १० हजार रुपयांमध्ये शेतकऱ्यांना उपलब्ध करुन देणे बंधनकारक असताना दामदुप्पट करुन वितरित केल्याचा आरोप मेश्राम यांनी केला.**

### मर्जीतील लाभार्थ्यांना दिला लाभ

**जिल्ह्यातील संबंधित व्यक्तींनी सत्तेचा गैरवापर करीत सहमर्जीतील नागरिकांना कृषी अवजारांचा लाभ मिळवून दिला. यासाठी शासकीय दरामध्ये कृषी अवजारे न देता त्यांच्याकडून अधिकची रक्कम अदा करण्यात आली आहे. कोणत्या गटाकडून किती रक्कम अदा केली याची यादी राष्ट्रवादी काँग्रेसकडे उपलब्ध असल्याचा दावा मिथुन मेश्राम यांनी केला.**

### सरपंच व पोलीस पाटलांच्या उपस्थितीत करा पंचनामे

**सन २०२२-२३ मध्ये जिल्ह्यातील ज्या-ज्या लाभार्थींना या योजनेचा लाभ देण्यात आला. त्या सर्व लाभार्थ्यांच्या कृषी साहित्याचे पंचनामे गावातील सरपंच, पोलीस पाटील, ग्रामसेवक, कृषी सहायक यांच्या समक्ष करुन उपयोगिता प्रमाणपत्र मागविण्यात यावे. या प्रकरणात भ्रष्टाचार करणाऱ्या अधिकारी, कर्मचाऱ्यांसह तत्कालीन लोकप्रतिनिधीवर देखील फौजदारी कारवाई करण्याची मागणी मिथुन मेश्राम यांनी केली.**

# जिल्ह्यात यंदा सर्वसाधारण क्षेत्रापेक्षा ज्वारीची जास्त लागवड

**गोंदिया:** जिल्ह्यात धान व दुसऱ्या क्रमांकावर गहू हीच पारंपरिक पीक आतापर्यंत चालत आली असून, शेतकरी अन्य पिकांकडे वळताना फारसा दिसत नव्हता. मात्र, आता धान शेती धोक्याची झाली असल्याने शेतकरी त्याला पर्याय म्हणून अन्य पिकांकडे आकर्षित होत आहे. हेच कारण आहे की, जिल्ह्यातील शेतकऱ्यांना गव्हाला बगल देत यंदा ज्व-ारी हाती घेतल्याचे दिसत आहे.यंदा सर्वसाधारण क्षेत्रापेक्षा अधिक क्षेत्रात शेतकऱ्यांनी ज्व-ारीची लागवड केली आहे.यंदा जिल्ह्यात २२३२.०७ हेक्टर गव्हाचे सर्वसाधारण क्षेत्र असून, त्यातील ५३३.१० हेक्टरमध्येच शेतकऱ्यांनी प्रत्यक्ष पेरणी केली आहे, तर ज्वारीचे ४३५.६० हेक्टर सर्वसाधारण क्षेत्र असून, शेतकऱ्यांनी चक्क ५३५.८९ हेक्टरमध्ये ज्वारीची प्रत्यक्ष पे-रणी केली आहे. यावरुन यंदा जिल्ह्यात ज्वारीचाच बोलबाला दिसून येत आहे.



जिल्ह्यातील शेतकरी फक्त धान शेतीलाच प्राधान्य देतो. आजही बहुतांश शेतकरी धान लागवडच करीत असून, दोन्ही हंगामात त्यांनी धान लावायचे हे ठरवूनच ठेवले आहे. मात्र, धान शेती नेहमीच धोक्याची राहिली असल्याचा इतिहास चालत आला आहे. हेच कारण आहे की, आजपर्यंत येथील शेतकरी समृद्ध झाला नाही. निसर्ग नेहमीच शेतकऱ्यांना झोडपून काढत आला आहे. यंदाही अवकाळी पावसाने शेतकऱ्यांच्या तोंडचा घास हिसकावून नेला आहे. वारंवारचा हा धोका बघता शेतकऱ्यांनी अन्य नगदी पिकांकडेही वळावे यासाठी कृषी विभागाकडून नवनवे प्रयोग केले जात आहेत. याचा काही प्रमाणात फायदा आता दिसून येत आहे.

### यामुळे ज्वारीला मागणी

**ज्वारीमध्ये फायबर, प्रोटीन, कॅल्शियम, मॅग्नेशियम, पोटॅशियम, आयर्न, फॅच आणि अँटी ऑक्सीडंट तत्त्व भरपूर प्रमाणात असतात. यामुळे ज्वारी खाल्ल्याने हाडांना मजबुती मिळते, ज्वारी लठ्ठपणा कमी करण्यास मदत करते, मधुमेहात ज्वारी फायदेशीर ठरते. तसेच त्वचेच्या कर्करोगापासून ज्वारीमुळे बचाव होतो. हेच कारण आहे की, ज्वारीला प्रचंड मागणी आहे.जिल्ह्यात सर्वसाधारण क्षेत्रापेक्षा जास्त क्षेत्रात ज्वारीची लागवड करण्यात आली आहे. यामध्ये गोंदिया तालुक्यात सर्वाधिक लागवड करण्यात आल्याचे दिसते. गोंदिया तालुक्यात ज्वारीचे ५९.४८ हेक्टर सर्वसाधारण क्षेत्र असतानाच १३० हेक्टरमध्ये लागवड करण्यात आली आहे. त्यानंतर गोरेगाव तालुक्यात ४९.४० हेक्टर सर्वसाधारण क्षेत्र असून, १२७.९० हेक्टरमध्ये, अर्जुनी-मोरगाव तालुक्यात ५५.२० हेक्टर सर्वसाधारण क्षेत्र असून, तेथे ११७ हेक्टरमध्ये तर देवरी तालुक्यात ६७.६४ हेक्टर सर्वसाधारण क्षेत्र असून, ९८ हेक्टरमध्ये लागवड करण्यात आली आहे. तर आमगाव तालुक्यात ४३.०४ हेक्टर सर्वसाधारण क्षेत्र असून लागवड फक्त ७.१० हेक्टरमध्ये तसेच सालेकसा तालुक्यात ४४.६० हेक्टर सर्वसाधारण क्षेत्र असून लागवड फक्त १९.१९ हेक्टरमध्ये करण्यात आली आहे. फक्त दोन तालुक्यात लागवड क्षेत्र कमी असून उर्वरित जिल्ह्यात ज्वारीचाच बोलबाला दिसून येत आहे.**

# वाहतूक नियंत्रणासाठी पाच स्मार्ट पोलीस बुथ

**गोंदिया:** वाहतूक सुरळीत व्हावी यासाठी गोंदियाचे वाहतुक पोलीस चौकाचौकात उभे राहून आपले कर्तव्य बजावत आहेत. मात्र सुरक्षा बुथ नसल्यामुळे उन, थंडी, पावसाळी वातावरणातही त्यांना मोकळ्या आकाशात सुरक्षा व्यवस्था करावी लागत आहे. हे पाहता गोंदिया जिल्हा पोलिसांनी जयपुरच्या धर्तीवर शहरात ५ ठिकाणी स्मार्ट पोलीस बुथ बांधण्याची योजना आखली. जिल्हा नियोजन समितीच्या पैशांतून बूथ गोंदियात पोहोचले. काही दिवसात ते वेग-वेगळ्या ५ ठिकाणी बसविण्यात येणार आहेत.



पावसाळा असो वा ऊन असो वा थंडी असो, गोंदियाचे वाहतूक पोलीस चौकाचौकात तैनात असतात आणि वाहतुकीचे नियम पाळण्याचा प्रयत्न करतात. चौकाचौकात कोणत्याही प्रकारची सुविधा नसल्याने पाऊन आणि कडक उन्हात तैनात असलेल्या वाहतूक पोलीस कर्मचाऱ्यांना सर्वाधिक त्रास सहन करावा लागतो. गोंदिया शहर हे जिल्ह्याचे प्रमुख व मुख्यालय असल्याने दररोज हजारो वाहने शहरात येतात. यादरम्यान वाहतुकीवरही परिणाम होतो.

वाहतूक सुरळीत राहण्यासाठी जिल्हा पोलिसांनी शहरातील प्रमुख चौकांवर वाहतूक पोलीस तैनात केले आहेत. त्यांच्या सुरक्षेच्या दृष्टीने शहरातील प्रमुख चौकात स्मार्ट पोलीस बूथ उभारण्याचा आराखडा गेल्या अनेक दिवसांपासून तयार करण्यात आला होता. मात्र निधीअभावी ही योजना पूर्ण करण्यात अडचणी निर्माण होत होत्या. अखेर जिल्हा पोलिसांनी जयपुरच्या धर्तीवर स्मार्ट पोलीस बुथ बांधण्याचा प्रस्ताव जिल्हा नियोजन समितीसमोर मांडला. हा प्रस्ताव मंजूर करुन नाविण्यपूर्ण योजनेंतर्गत निधी मंजूर करण्यात आला. निधी मिळताच स्मार्ट बुथ खरेदी करण्यात आले असून ते लवकरच शहरातील प्रमुख चौकात बसविण्यात येणार आहेत.

### येथे लागणार स्मार्ट बुथ

**स्मार्ट बुथ पूर्णपणे तयार आहेत. आता शहरातील मुख्य जयस्तंभ चौक, फुलचूर नाका, पतंगा चौक, मरारटोली आणि कुडवा नाका या ठिकाणी हे स्मार्ट बुथ बसविण्यात येणार आहेत. या स्मार्ट बुथमध्ये बसण्याची व्यवस्था, पंखा, लाईट, चॉर्जिंग पॉईंट, अनाउन्समेंट सिस्टीमचीही व्यवस्था करण्यात आली आहे.**

# कर्मचाऱ्यांची आर्थिक, सामाजिक सुरक्षा जुन्या पेन्शन योजनेप्रमाणे राखली जाईल-मुख्यमंत्री एकनाथ शिंदे

**नागपूर:** राज्यातील अधिकारी, कर्मचाऱ्यांना जुनी सेवा निवृत्ती वेतन योजना लागू करण्यासंदर्भात नेमलेल्या समितीचा अहवाल प्राप्त झाला आहे. त्यावर अभ्यास करण्याचे निर्देश देण्यात आले असून मुख्य सचिवांमार्फत त्याबाबतचे मत शासनाला सादर करण्यात येईल. निवृत्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांची आर्थिक व सामाजिक सुरक्षा जुन्या पेन्शन योजनेप्रमाणे योग्य प्रकारे राखली जाईल, या मूळ तत्वावर शासन ठाम आहे. शासनाला प्राप्त झालेला अहवाल व त्यावरील चर्चा आणि अंतिम निर्णय हा या तत्वाशी सुसंगत असेल. त्यामुळे या अहवालावर अंतिम निर्णय येत्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात घेण्यात येईल, अशी ग्वाही देतानाच अधिकारी कर्मचाऱ्यांनी संप मागे घ्यावा, असे आवाहन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी विधानसभेत निवेदनाद्वारे केले.

यासंदर्भात निवेदनाद्वारे माहिती देताना मुख्यमंत्री श्री. शिंदे म्हणाले, राज्यातील राज्य शासकीय अधिकारी, कर्मचारी समन्वय संघटनांच्या विविध मागण्यांसदर्भात बैठक घेण्यात घेण्यात आली. या बैठकीस उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासह आमदार, विविध संघटनांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

जुनी पेन्शन योजना लागू करण्यासंदर्भात यापूर्वी शासनाने नेमलेल्या सुबोधकुमार समितीचा अहवाल शासनाला प्राप्त झाला आहे. त्यावर या बैठकीत सविस्तर चर्चा करण्यात आली. अधिकारी,कर्मचारी संघटनेने ज्या मागण्या केल्या होत्या, त्यावर महत्वपूर्ण असे सकारात्मक निर्णय घेण्यात आले आहेत. संघटनांच्या




मागणीनुसार राज्य शासनाने महत्वाचे पाच निर्णय घेतले आहेत त्याची माहिती देताना मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी सांगितले की, दिनांक ३१ मे २००५ पूर्वी जाहिरात दिलेल्या अधिसूचित केलेल्या पदांवरील नियुक्त्यांना म.ना.से. (निवृत्तीवेतन) नियम, १९८२ अंतर्गत समाविष्ट करण्याचा निर्णय घेण्यात येणार आहे. याबाबतचा प्रस्ताव मंत्रिमंडळापुढे मान्यतेसाठी ठेवण्यात येणार असून त्याचा लाभ सुमारे २६ हजार अधिकारी, कर्मचाऱ्यांना होणार आहे. यासोबतच ८० वर्षांवरील निवृत्तीवेतनधारकांना केंद्राप्रमाणे अतिरिक्त निवृत्तीवेतन अदा करणे, सेवानिवृत्ती उपदान/मृत्यू उपदानाची मर्यादा केंद्राप्रमाणे वाढविणे, निवृत्तीवेतन, अंशराशीकरण पुनर्रस्थापना कालावधी कमी करणे आणि वित्त व लेखा विभागातील सेवाप्रवेश नियमांबाबत बैठक झाली असून त्याचा निर्णय अंतिम टप्यात असल्याचे मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी सांगितले.

जुनी पेन्शन योजना लागू करण्यासंबंधात नेमलेल्या समितीने आपला अहवाल गेल्याच आठवड्यात शासनाला सादर केला आहे. यामध्ये समितीने सुचविलेल्या तरतुदी लागू करण्याकरिता त्याचा सविस्तर अभ्यास होणे आवश्यक आहे. हा अभ्यास करण्याचे निर्देश वित्त विभागाचे अपर मुख्य सचिव, आणि सामान्य प्रशासन विभागाचे अपर मुख्य सचिव यांना देण्यात आले आहे. हे दोन्ही अधिकारी संघटनेच्या प्रतिनिधींशी विचार विनिमय करुन, आपले मत मुख्य सचिव यांच्यामार्फत शासनास सादर करतील. निवृत्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांची आर्थिक व सामाजिक सुरक्षा जुन्या पेन्शन योजनेप्रमाणे योग्य प्रकारे राखली जाईल, या मूळ तत्वावर शासन ठाम आहे. प्राप्त अहवाल व त्यावरील चर्चा व अंतिम निर्णय हा या तत्वाशी सुसंगत असेल. सदर अहवालावर अंतिम निर्णय येत्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात घेण्यात येईल.

संघटनेच्या मागण्यांप्रती शासन सकारात्मक असून संघटनेने सुरु केलेला संप त्वरीत मागे घ्यावा व सर्वसामान्य जनतेची गैरसोय होणार नाही, याची काळजी घ्यावी, असे आवाहन मुख्मंत्र्यांनी यावेळी केले आहे.

# ओबीसी संघटनांच्या आंदोलनाचे फलित आधार योजनेचा निघाला जीआर?

**गोंदिया:-** राज्य सरकारच्यावतीने गेल्या दोन तीन वर्षापासून ओबीसींना वसतीगृह व स्वाधारच्या धर्तीवर आधार योजना लागू करण्यासंदर्भात आश्वासनाशिवाय काहीच मिळत नव्हते.मात्र विदर्भातील ओबीसी संघटनांनी सातत्याने याकरीता पाठपुरावा करीत विविध आंदोलनातून शासनाचे लक्ष वेधण्याचे काम केले.त्यातच नागपूरातील हिवाळी अधिवेशनादरम्यान मुख्यमंत्र्यांच्या नावे १ लाख पोस्टकार्ड पाठविण्याचे अभियान हाती घेत १ लाख स्वाक्षरीचे निवेदन देण्याची तयारी सुरु केली होती. या सर्व गोष्टींची दखल अखेर राज्य सरकारला घ्यावी लागली असून पहिल्या टप्यात ओबीसी विद्यार्थ्याकरींता स्वाधारच्या धरतीवर विद्यार्थ्यांना सावित्रीबाई फुले आधार योजना लागू करण्यासंदर्भातील शासन निर्णय १३ डिसेंबरला जारी करावा लागला आहे. या शासन निर्णयानुसार ज्या विद्यार्थ्यांना वसतीगृहात संधी मिळणार नाही,त्यांना लाभ मिळणार असून शहरी विभागासाठी ६०००० रु, उपशहरी विभागासाठी, ५१०००रु आणि नागरी विभागासाठी ४१००० रू व तहसील विभागासाठी ३८०००रु मंजुर करण्यात आले आहे.



इतर मागास वर्ग, विमुक्त जाती व भटक्या जमाती आणि विशेष मागास प्रवर्गातील उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी आदिवासी विकास विभागाच्या स्वयंम व सामाजिक न्याय विभागाच्या स्वाधार योजनेच्या धर्तीवर शासकीय वसतीगृहात प्रवेश न मिळालेल्या विद्यार्थ्यांना थेट लाभ देणारी महत्वाकांक्षी अशी "ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आधार योजना' राबविण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. त्यासंदर्भातील शासन निर्णय निर्गमित करण्यात आला असल्याची माहिती इतर मागास बहुजन कल्याण मंत्री अतुल सावे यांनी दिली. इतर मागास बहुजन कल्याण विभागामार्फत राबविल्या जाणाऱ्या विविध योजनांसाठी नागपूर येथील हिवाळी अधिवेशनात ३३७७ कोटींच्या पुरवणी मागण्यांना मंगळवारी मंजुरी मिळाली. या मंजुरीनंतर ओबीसी विभागाचे २०२३-२४ च्या योजनांसाठी तरतूद ७८७३ कोटी इतकी झाली आहे. ओबीसी विभाग स्थापन झाल्यानंतर एका वर्षासाठी झालेली ही विक्रमी तरतूद आहे. मागील वर्षाच्या तुलनेत ३०८१ कोटी अधिक आहेत.

इतर मागास बहुजन कल्याण विभागामार्फत ही महात्वाकांक्षी योजना राबविण्यात येणार आहे. प्रत्येक जिल्ह्यातून ६०० प्रमाणे २१ हजार ६०० विद्यार्थ्यांना या योजनेचा लाभ मिळणार आहे. भोजन भत्ता, निवास भत्ता व निर्वाह भत्ता विद्यार्थ्यांच्या आधार क्रमांक संलग्न असलेल्या बँक खात्यात थेट जमा होणार आहे.

विदर्भातील ओबीसी युवा अधिकार मंच, ओबीसी अधिकार मंच, ओबीसी सेवा संघ, ओबीसी संघर्ष कृती समिती, ओबीसी जनमोर्चा, ओबीसी क्रांती मोर्चा, भारतीय पिछडा शोषित संघसह विविध ओबीसी संघटनाच्या सातत्याच्या दबावामुळे आणि गेल्या २ वर्षापासून मंडल जनजागृती सप्ताहाच्या माध्यमातून सातत्याने ओबीसींच्या विद्यार्थ्याकरीता स्वाधारच्या धर्तीवर आधार योजना सुरु करण्याकरीता पाठपुरावा सुरु होता. त्यातच विधानसभेचे हिवाळी अधिवेशन सुरु होताच १ लाख पोस्टकार्ड अभियान व सह्यांचे निवेदनाची जय्यत तयारी सुरु असल्याचे बघून अखेर ओबीसी बहुजन मंत्रालयाने ओबीसीकरीता आधार योजनेचा शासन निर्णय जाहीर केला, हा खरा विजय आहे.

# आयुष्मान भारत योजनेचा लाभ तळागाळातील लोकांपर्यंत पोहोचवा-डॉ.ओमप्रकाश शेटे



**गोंदिया:** केंद्र शासनाच्या आयुष्मान भारत - प्रधानमंत्री जन आरोग्य योजना व महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत ५ लाख रुपयाचा आरोग्य विमा शासनातर्फे मोफत काढण्यात येत असून १३५६ विविध आजारांवर मोफत औषधोपचार व शस्त्रक्रियेचा खर्च करण्याची तरतूद या योजनेत आहे. त्यामुळे समाजातील तळागाळातील लोकांपर्यंत दोन्ही योजनेचा लाभ मिळण्याकरीता सर्व विभागांनी समन्वयाने काम करण्याच्या सूचना आयुष्मान भारत मिशन महाराष्ट्र समितीचे प्रमुख डॉ.ओमप्रकाश शेटे यांनी येथे केल्या.

जिल्हाधिकारी कार्यालयाच्या जिल्हा नियोजन समिती सभागृहात आयोजित आयुष्मान भारत योजनेचा आढावा घेतांना डॉ.शेटे बोलत होते. जि.प.चे मुख्य कार्यकारी अधिकारी अनिल पाटील, निवासी उपजिल्हाधिकारी स्मिता बेलपत्रे, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ.अमरीश मोहबे, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.नितीन वानखेडे, अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.नितीन कापसे यांची यावेळी प्रामुख्याने उपस्थिती होती.

डॉ. ओमप्रकाश शेटे म्हणाले, प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेचे लाभार्थी हे सामाजिक, आर्थिक व जातनिहाय जनगणनेच्या वंचित व व्यावसायिक निकषानुसार ग्रामीण व शहरी क्षेत्रातील कुटूंबातील आहेत. गावपातळीवर ग्राहक सेवा केंद्राच्या माध्यमातून आयुष्यमान भारत कार्ड मोफत बनविण्यात येत आहेत. गावपातळीवर आशा स्वयंसेविकेच्या माध्यमातून लाभार्थ्यांपर्यत सदर योजनेची व्यापक प्रमाणात जनजागृती करणे आवश्यक असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

सद्यस्थितीत गावपातळीवर महिलांमध्ये आजारांबाबत अनेक गैरसमजुती आहेत. अजानतेपणामुळे आजार शेवटच्या स्तरावर पोहोचल्यानंतर भरती व उपचार करणे अवघड होते. त्यानंतरचा औषधोपचार व शस्त्रक्रिया खर्च अवाजवी दराने खाजगी दवाखान्यांमध्ये आकारला जातो. सदर खर्च गोरगरीबांना परवडणारा नसल्यामुळे खाजगी रुग्णालयांनी सामाजिक दायित्व या नात्याने औषधोपचाराचा खर्च या योजनेतून करण्यात यावा असे त्यांनी सांगितले.

गोंदिया जिल्ह्यात आयुष्यमान भारत योजनेत सरकारी दवाखान्यासह एकूण ११ हॉस्पिटल अंगीकृत आहेत. यामध्ये ६ शासकीय दवाखाने असून ५ खाजगी हॉस्पीटल्स आहेत. त्यात बाई गंगाबाई स्त्री रुग्णालय, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, उपजिल्हा रुग्णालय तिरोडा, ग्रामीण रुग्णालय अर्जुनी मोरगाव, ग्रामीण रुग्णालय देवरी, ग्रामीण रुग्णालय सडक अर्जुनी तसेच खाजगी रुग्णालयामध्ये बालाजी नर्सिंग होम, ब्राम्हणकर सुपर स्पेशालिटी हॉस्पीटल, गोंदिया केअर हॉस्पीटल, न्यु गोंदिया हॉस्पीटल, रिलायन्स हॉस्पीटल यांचा यात समावेश आहे. तरी अंगीकृत खाजगी रुग्णालयांनी आयुष्यमान भारत योजनेअंतर्गत लाभार्थ्यांकडून अवाजवी खर्च घेवू नये असे निर्देश त्यांनी यावेळी दिले.

आयुष्मान भारत योजनेचे जिल्ह्यात १० लाख ७४ हजार १७९ लाभार्थी असून ३ लाख २ हजार ६८ लाभार्थ्यांनी आयुष्मान भारत कार्ड बनविले आहे. तरी उर्वरित ७ लाख ७२ हजार २११ लाभार्थ्यांना कार्ड बनविण्याकरीता ग्रामपंचायत व रेशन दुकानदार यांनी पुढाकार घेवून जिल्ह्यातील गोरगरीब लोकांना आयुष्मान भारत योजनेचा लाभ घेण्याकरीता प्रोत्साहित करण्याचे निर्देश त्यांनी जिल्हा प्रशासनाला दिले.

यावेळी राष्ट्रीय बाल स्वास्थ कार्यक्रम व राष्ट्रीय आरोग्य अभियानातील पायाभुत सुविधा बाबतचा सविस्तर आढावा घेण्यात आला. यावेळी त्यांनी आरोग्य सेवेतील अधिकारी व कर्मचारी यांच्या समस्या जाणून घेतल्या. आरोग्य सेवेत प्रत्यक्ष काम करतांना येणाऱ्या अडचणींचे/समस्यांचे निराकरण करण्यात येईल असे त्यांनी यावेळी आश्वासीत केले. आयुष्मान भारत योजनेमधील तांत्रिक त्रुटी दूर करून लवकरच सदर योजना नव्या सुधारणासह येणार आहे असेही त्यांनी यावेळी सांगितले.

सभेला माता व बाल संगोपन अधिकारी डॉ.रोशन राऊत, निवासी वैद्यकीय अधिकारी डॉ. बी.डी.जायसवाल, आयुष्मान भारत योजनेच्या जिल्हा समन्वयक डॉ.जयंती पटले यांच्यासह जिल्ह्यातील सर्व तालुका आरोग्य अधिकारी, वैद्यकीय अधीक्षक, गट विकास अधिकारी व आरोग्य विभागातील अधिकारी व कार्यक्रम समन्वयक उपस्थित होते.

## विषमता निर्माण करणाऱ्या सरकारला पायउतार करा

गोरेगाव- शिवाजी महाराज, महात्मा फुले,शाहू महाराज, डॉ बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांची ही भूमी आहे. समतेच्या राज्यात आता जाती जाती मध्ये झगडे लावण्याचे काम महायुतीची सरकार करत आहे. जातीभेद निर्माण करून समतेच्या राज्यात विषमता व जनतेत कटुता निर्माण करण्यारा सरकारला पायउतार करा, असे मिथुन मेश्राम म्हणाले.

# पुढील वर्षात हर घर नलसे जल-इंजि कटरे

**गोंदिया :-** भविष्यात पिण्याच्या पाण्याचे दुर्भीक्ष जानवू नये यासाठी केंद्र सरकारने जल जीवन मिशन योजना आणली आहे. पुढील वर्षात सण २०२४ मध्ये 'हर घर नलसे जल' हे साकार होणार असून प्रत्येक गांव जल समृद्ध गांव होईल अशी ग्वाही सेवानिवृत्त कार्यकारी अभियंता संजय कटरे यांनी (ता.१५) दिली. श्री कटरे हे रावणवाडी येथे आयोजित प्रशिक्षण शिबीरात मास्टर ट्रेनर म्हणून प्रशिक्षण देतांना बोलत होते.

यावेळी नागपूरचे प्राचार्य श्री बनसोड, प्रवीण प्रशिक्षक पृथ्वीराज कोल्हटकर, रावणवाडीच्या सरपंच श्रीमती वासनिक आणि समन्वयक गजभिये उपस्थित होते.

या प्रशिक्षणात रावणवाडी, वटाणा, परसवाडा, कटंग टोला आदि क्षेत्रातील सरपंच, जलसूरक्षक, आशा कार्यकर्ते आणि



बचत गटाच्या पदाधिकारी यांनी सहभाग घेतला. प्रशिक्षणाची सुरुवात माता सवित्रीमाई फुले, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज आणि संत गाडगेबाबा यांच्या छायाचित्रांना माल्यार्पण करून झाली.

यावेळी पहिल्या दिवसी जल समृद्ध व स्वच्छ गांव व शास्वत सेवा प्रदानाचे मुख्य घटक, पाणी पुरवठा सुविधा कार्यन्वयन चाचणी संकल्पना व कार्य पद्धत तसेच पाणी पुरवठा योजनाचे हस्तानतरणाची प्रक्रिया अश्या विविध विषयाचा समावेश करण्यात आला. यावेळी वातावरण निर्मितीसाठी प्रशिक्षुणा परिचयाची पद्धती, माझ्या स्वप्नातील गांव, आणि योजना फेरी खेळ अत्यंत आवडला असे प्रशिक्षु उपस्थितांनी सांगितलं. प्राचार्य बनसोड साहेबांनी स्वतः उपस्थित राहून प्रशिक्षणासाठी लागणारे सर्वच दर्जेदार साहित्य उपलब्ध करून दिल्याने त्यांच्या कार्याची प्रशंसा करण्यात आली. हे प्रशिक्षण येत्या १७ डिसेंबर पर्यत चालणार असून संपूर्ण जिल्ह्यात १८ जानेवारीपर्यंत सुरु राहणार आहे. या प्रशिक्षणाचा लाभ घेण्याचे आवाहन आयोजकांनी केले आहे.

## चार आठवड्यात प्रशासनाने न्यायालयाला उत्तर द्यावे

**गोंदिया:-** जिल्ह्यातील देवरी उपविभागाअंतर्गत येणाऱ्या आमगाव तालुक्यातील रिक्त कोतवाल पदभरती प्रकरणी न्यायालयाने शासनाला चार आठवड्यात उत्तर सादर करण्याचे बजावले आहे. जिल्ह्यात कोतवाल पदभरती प्रक्रीया चांगलीच वादाच्या भोवऱ्यात सापडली. स्थानिक प्रशासन पदभरती पारदर्शक झाल्याचे सांगत असले तरी यात मोठा गैरप्रकार झाल्याने अनेकांनी न्यायालयाचे द्वार ठोठावले. देवरी उप विभागातील आमगाव तालुक्यातील रिक्त पदांसाठी २६ जून २०२३ रोजी जाहिरात प्रसिद्धर करण्यात आली. ३० जुलै रोजी लेखी परीक्षा घेण्यात आली.

३१ जुलैला निकाल घोषित करून गुणवत्तेनुसार यादी जाहीर करण्यात आली. परीक्षा सदोष असल्याने अनेक तक्रारी वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे झाल्या. मात्र चौकशी झाली नाही. मुंडीपार येथील उमेदवार भूवनेंद्रकुमार कुरंजेकर याने नागपुर येथील महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण येथे धाव घेत प्रकरण दाखल केले. आज १५ डिसेंबर रोजी प्रकरणावर सुनावणी झाली. मॅटने सर्व प्रतिवादी जनरल सेक्रेटरी रेव्हेन्यू, गोंदियाचे जिल्हाधीकारी, देवरीचे एसडीओ, आमगावचे तहसीलदार यांना चार आठवड्यात उत्तर सादर करण्याचे आदेश दिले आहे. अर्जदारातर्फे वकील अदिती पारधी यांनी बाजू मांडली.

महात्मा गांधी याच्या जंयतीनिमित्य पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी स्वच्छ भारत अभियान २ ऑक्टोबर २०१४ ला सुरू केले. मात्र अभियानाचे वर्ष २०१५ असे गुण देणाऱ्या अधिकाऱ्याने मानले. अधिकाऱ्यांची तयार केलेली मॉडेल एन्सर शीट चुकीच्या पद्धतीने तयार केली आहे. ही बाब अर्जदारांच्या वकिलांनी न्यायालयाच्या लक्षात आणून दिली. दरम्यान मॅटने प्रतिवादी महसूल विभागाचे सचिव जिल्हाधिकारी, उपविभागीय अधिकारी, तहसीलदार यांच्यासह कोतवालपदी नियुक्त उमेदवार भाग्यवान हरीणखेडे यांना चार आठवड्यात उत्तर सादर करण्याचे आदेश दिले आहे.

# देशाला एकसंघ ठेवणारे साहित्य झाडीबोलीने द्यावे-आमदार मनोहर चंद्रिकापूरे

**सडक अर्जुनी:-** झाडीबोली साहित्य एक उत्तम असा ठेवा आहे. आपल्या झाडीपट्टीत ही सातत्याने होणारी साहित्य संमेलने इथल्या बोली व संस्कृतीला जिवंत ठेवण्याचे काम करतात. डॉ. हरिश्चंद्र बोरकर यांनी ३० वर्षापूर्वी लावलेल्या या झाडीबोली चळवळीच्या इवल्याशा रोपट्याचे आता वटवृक्षात रूपांतर झालेले आहे. ही अत्यंत आनंदाची बाब आहे. झाडीबोलीतून निर्माण होणारे साहित्य हे जीवन जगण्याची प्रेरणा देणारे असावे.त्यातून जीवनाला आवश्यक असे मार्गदर्शन मिळावे. विशेष म्हणजे विविधतेने नटलेल्या या देशात विविध भाषा बोलल्या जातात. झाडीबोलीतून या देशा एकसंघ ठेवणारे सर्वसमावेशक साहित्य निर्माण व्हावे याकडे लेखकांनी लक्ष देणे गरजेचे आहे असे प्रतिपादन अर्जुनी /मोर.विधानसभा क्षेत्राचे आमदार मनोहर चंद्रिकापूरे यांनी बाम्हणी खडकी येथे केले. झाडीबोली साहित्य मंडळ साकोली व झाडीबोली शाखा बाम्हणी खडकी यांच्या संयुक्त विद्यमाने येथील आद्य नाटककार भवभूती साहित्य नगरीत आयोजित ३१ व्या झाडीबोली साहित्य संमेलनाचे उदघाटन करतांना ते बोलत होते.

यावेळी संमेलनाध्यक्ष डॉ. चंद्रकांत लेनगूरे, प्रमुख अतिथी केंद्रिय संस्थापक अध्यक्ष डॉ.हरिश्चंद्र बोरकर, पूर्व संमेलनाध्यक्ष कवयत्री रंजना हलमारे, पूर्व स्वागताध्यक्ष अमोल हलमारे, पूर्वाध्यक्ष राजन जायस्वाल, अॅड. लखनसिंह कटरे, डॉ.हेमकृष्ण कापगते, डॉ.गुरूप्रसाद पाखमोडे, कवी हिरामन लांजे, कवयत्री अंजना खुणे, संतकवी डोमाजी कापगते, डॉ. मनोहर नरांजे, ग्रामगीताचार्य बंडोपंत बोढेकर, ना.गो.थुटे, नरेश देशमुख, अ.भा.सरपंच परिषदेचे जिल्हाध्यक्ष चंद्रकुमार बहेकार, गोंदिया जिल्हाध्यक्ष पवन पाथोडे, भंडारा जिल्हाध्यक्ष कुंजीराम गोंधळे, चंद्रपूर जिल्हाध्यक्ष अरूण झगडकर, गडचिरोली जिल्हा अध्यक्ष विनायक धानोरकर,मूल येथे नुकत्याच आयोजित पहिल्या महिला झाडीबोली साहित्य संमेलनाच्या अध्यक्ष शशिकला गावतुरे, स्वागताध्यक्ष रत्नमाला भोयर, विजया ब्राम्हणकर, पंडीत लोंढे, सुभाष धकाते, संजय निंबेकर, लक्ष्मण खोब्रागडे, सुखदेव चौथाले, स्वागताध्यक्ष विलास वट्टी आदी मान्यवर उपस्थित होते. याचवेळी बोलीमहर्षी डॉ.हरिश्चंद्र बोरकर यांना वेदप्रतिष्ठान नागपूरच्या वतीने साहित्यवेध पुरस्कार तसेच अ.भा. विद्रोही मराठी साहित्य संमेलन वर्धा यांच्या वतीने एक पुरस्कार डॉ.मनोहर नरांजे यांच्या तर्फे प्रदान करण्यात आला.

उदघाटन सोहळ्याअगोदर गावातून पुस्तक पोहा नामक ग्रंथ दिंडी काढण्यात आली. यात रांगोळी स्पर्धा व वेषभूषा स्पर्धा घेण्यात आली. या ग्रंथदिंडीच्या निमित्ताने गावातील लोककलांचे मनमोहक दर्शन झाले. उदघाटनावेळी पूर्वाध्यक्ष रंजना हलमारे व स्वागताध्यक्ष अमोल हलमारे यांनी संमेलनाची सुत्रे चंद्रकांत लेनगुरे यांच्याकडे सोपविली. तत्पूर्वी झाडीबोली चळवळीत योगदान असणाऱ्या व एक वर्षात निधन झालेल्या श्रीराम खुणे, गणपती वडपल्लीवार, आनंदराव मस्के, मदन धनकर, तुळशीदास लंजे, केशव शेंडे, यशवंत लंजे, भारत कापगते यांना भावपूर्ण श्रद्धांजली देण्यात आली. दुकोडा कार्यक्रमाचे संचालन ताराचंद कापगते यांनी केले.

यावेळी प्रस्तावनेतून ग्रामगीताचार्य बंडोपंत बोढेकर यांनी झाडीबोली चळवळीचा प्रवास वर्णन केला. तत्पूर्वी शाहीर नंदू मसराम व संचाने उत्कृष्ट पद्धतीने हरिश्चंद्र बोरकर लिखित झाडीगौरव गीत सादर केले. यावेळी महिला साहित्य संमेलनाच्या अध्यक्ष शशिकला गावतुरे यांनी व पूर्व संमेलनाध्यक्ष रंजना हलमारे यांनी झाडीबोली साहित्य क्षेत्रात व चळवळीत महिलांचे योगदान स्पष्ट शब्दांत मांडले. आदव्याची सुपारी यातून विलास वट्टी यांनी बाम्हणी खडकी येथील साहित्य संमेलनाचे प्रयोजन व इथला इतिहास झाडीबोलीतून मांडला. डॉ.हरिश्चंद्र बोरकर यांनी देखील झाडीबोलीच्या विस्ताराबाबत आशादायी चित्र निर्माण झाल्याबद्दल आनंद व्यक्त केला व तरूणांनी ही जबाबदारी खांद्यावर घेण्याचे आवाहन केले. संमेलनाध्यक्ष डॉ.चंद्रकांत लेनगुरे यांनी झाडीबोली संमेलनाध्यक्षपदाची धुरा आपल्यावर सोपविल्याबद्दल धन्यवाद मानले व मराठी भाषेवर इतर भाषांचे चाललेले आक्रमण थोपविण्यासाठी आपण सावध असणे गरजेचे आहे असे प्रतिपादन केले.




याप्रसंगी 'मातीतून अबारात' या कवितासंग्रहासाठी कवी मुरलीधर खोटेले यांना नाथ घरडे कविता पुरस्कार व डॉ.घनश्याम डोंगरे संपादन पुरस्कार कुंजीराम गोंधळे यांच्या 'झाडीबोली :स्वरूप व विचार' या पुस्तकाला प्रदान करण्यात आला. याचवेळी अनेक पुस्तकांचे प्रकाशन करण्यात आले. यात संत डोमा कापगते यांच्या 'सुबोध अमृतवचने', हरिश्चंद्र माझा झाडीचा राजा, 'सार्थ पंचरत्न गीता' अॅड.मनिष कापगते संपादितफ जनसंवादी डॉ.हेमकृष्ण कापगतेफ, मुरलीधर खोटेले यांचे 'सटवा', पालिकचंद बिसने यांचे 'तारूण्याचे तरंग' छाया बोरकर यांच्या ममाणसाने खाल्लूया मिठाला जागावे, अडला हरी गाढवाचे पाय धरी, 'हृदयात हिरवाई जपतांना' डॉ.डी.एम .सुरसाऊत यांचे 'अश्रूधारा', अंजना खुणे यांचे मअंजनाबाईची कविता, पी.डी.काटकर यांचे कळा लागल्या या जीवा, दौलतभाई पठाण यांचे दर्द ए गम, अल्का दुधबुरे यांचे मशब्द-वेधफ, वामन हाडगे यांचे अंभगवाणी व अभंगमाला या पुस्तकांचे प्रकाशन झाले. कार्यक्रमाचे संचालन पूर्वाध्यक्ष संजयकुमार निंबेकर यांनी तर आभार प्रदर्शन गोंदिया जिल्हाध्यक्ष पवन पाथोडे यांनी केले. यशस्वीतेसाठी विकास खोटेले, विलास शिवनकर, नरेश भेंडारकर, प्रदीप मेश्राम, योगेश्वर गजभिये, किशोर तरोणे, अरूण झगडकर, कुंजीराम गोंधळे, मुरलीधर खोटेले व सर्व आयोजक व ग्रामस्थांनी सहकार्य केले.

# त्या पाच आरोग्यवर्धिनी केंद्राचे लोकार्पण आता तरी होणार का?

## साडेचार वर्षांपासून उद्घाटनाच्या प्रतीक्षेत: सहषराम कोरोटे यांनी वेधले सभागृहाचे लक्ष

**सालेकसा:** तालुक्यातील गोर्रे आरोग्यवर्धिनी केंद्रासह जिल्ह्यातील पाच आरोग्यवर्धिनी केंद्राचे उद्घाटन गेल्या साडेचार वर्षांपासून रखडले आहे. या सर्व आरोग्य केंद्राच्या इमारती गेल्या साडेचार वर्षांपासून धुळखात आहेत. परिणामी या भागातील नागरिक आरोग्यसेवेपासून वंचित आहेत. हा मुद्दा लावून धरल्यानंतर आमदार सहषराम कोरोटे यांनी नागपूर येथील हिवाळी अधिवेशनात गोर्रे प्राथमिक आरोग्य केंद्राचे लोकार्पण केव्हा करणार असा मुद्दा उपस्थित करीत सभागृहाचे लक्ष वेधले.

या पाचही प्राथमिक आरोग्य केंद्राचे उद्घाटन करण्याची मागणी केली, तसेच वैद्यकीय




अधिकारी, आरोग्य कर्मचारी व इतर कर्मचाऱ्यांची पदे भरुन, स्वतंत्र ट्रान्सफार्मर बसवून, त्यानंतरही आता या प्राथमिक आरोग्य केंद्रासह जिल्ह्यातील अन्य चार प्राथमिक आरोग्य केंद्राचे उद्घाटण होणार का? याकडे लक्ष लागले आहे. गोर्रे आरोग्यवर्धिनी केंद्रासह अन्य चार प्राथमिक आरोग्य केंद्राचे लोकार्पण न झाल्याने लाखो रुपयांचे साहित्य खराब होत आहे. युती सरकारच्या काळात देवेंद्र फडणवीस हे मुख्यमंत्री असताना गोंदिया जिल्ह्यात काही नवीन प्राथमिक आरोग्य केंद्रांना (आरोग्यवर्धिनी केंद्र) मंजुरी देण्यात आली. पाच वर्षापुर्वी गोंदिया जिल्ह्यातील पाच नवीन प्राथमिक आरोग्य केंद्रासाठी सर्वसुविधांनीयुक्त नवीन प्रशस्त इमारती बांधण्यात आल्या होत्या; पण त्यांचे लोकार्पण अद्यापही करण्यात आले नाही.

### पाच प्राथमिक आरोग्य केंद्रे उद्घाटनाच्या प्रतीक्षेत

**सालेकसा तालुक्यातील आरोग्यवर्धिनी केंद्र गोर्रे, देवरी तालुक्यातील आरोग्यवर्धिनी केंद्र पालांदूर (जमीनदार), सडक अर्जुनी तालुक्यातील आरोग्यवर्धिनी केंद्र चिखली, अर्जुनी मोरगाव तालुक्यातील आरोग्यवर्धिनी केंद्र इळदा ही पाच नवीन प्राथमिक आरोग्य केंद्रे आहेत. तिरोडा तहसील, आरोग्य केंद्र बेरडीपार या पाचही प्राथमिक आरोग्य केंद्राचे लोकार्पण रखडले आहे.**

### कर्मचाऱ्यांची पदे केव्हा भरणार

**जिल्ह्यात पाच नवीन आरोग्य केंद्राचे उद्घाटन झाल्यास सर्वात मोठी अडचण कर्मचाऱ्यांची होणार आहे. काही प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये काही कर्मचाऱ्यांची नियुक्ती वगळता जवळपास सर्वच पाच प्राथमिक आरोग्य केंद्रावर वैद्यकीय अधिकारी व इतर अत्यावश्यक आरोग्य कर्मचाऱ्यांची नियुक्ती केली नाही. त्यामुळे लोकार्पणापुर्वी कर्मचाऱ्यांची पदे भरण्याची गरज आहे.**

# पोलीस पाटलांच्या मोर्चाची उपमुख्यमंत्र्यांनी घेतली दखल

**गोंदिया:** महाराष्ट्र राज्य गाव कामगार पोलीस पाटील संघाच्यावतीने नागपूर विधानसभा अधिवेशनावर प्रलंबित मागण्यांसाठी गुरुवारी (दि.१४) मोर्चा काढण्यात आला होता. शिष्टमंडळाने विधान भवनात उपमुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली असता त्यांनी आपल्या मागण्यांची दखल घेत त्या लवकरात लवकर निकाली काढण्यात येतील असे आश्वासन शिष्टमंडळाला दिले.

पोलीस पाटलांचे मानधन १८ हजार रुपये करण्यात यावे, सेवानिवृत्तीचे वय ६५ करण्यात यावे, सर्व सेवानिवृत्त पोलीस पाटलांना सेवानिवृत्तीची योजना लागू करावी, पोलीस पाटील पदाचे नुतनीकरण बंद करण्यात यावे, ग्राम पोलीस अधिनियम १९६७ मध्ये दुरुस्ती करण्यात यावी, नक्षलवाद्यांनी मारलेल्या पोलीस पाटलांच्या वारसदारांना ५० लाख रुपये मदत



देण्यात यवी आदी मागण्यांसाठी पोलीस पाटील संघटनेच्यावतीने गुरुवारी (दि.१४) विधानभवनावर मोर्चा काढण्यात आला होता. याप्रसंगी पोलीस पाटील मोर्चा संयोजक तथा राज्य कार्याध्यक्ष भृंगराज परशुरामकर, राज्य अध्यक्ष बाळासाहेब शिंदे, कार्यकारी अध्यक्ष श्रीकृष्ण साळुंखे, नागपूर विभागीय अध्यक्ष विजय घाडगे, जब्बार पठाण यांच्या शिष्टमंडळाने उपमुख्यमंत्री फडणवीस यांची भेट घेऊन त्यांच्यासोबत चर्चा केली. यावर फडणवीस यांनी, सर्व मागण्या रास्त असून त्या लवकरात लवकर पूर्ण करण्यात येतील. यानंतर पोलीस पाटलांना मोर्चा काढण्याची आवश्यकता राहणार नाही असे आश्वासन दिले. विशेष म्हणजे याप्रसंगी ना. गिरीश महाजन, आ.मंगेश चव्हाण, आ.आशिष जायस्वाल, माजी मंत्री जयंत क्षीरसागर यांनी सहकार्य केले. मोर्चासाठी गणेश देवढे, योगेश मते, सुधाकर साठवणे, योगेश नाकाडे, रितेश दुरुगकर, राजेश बन्सोड, यशवंत इरदंडे, हरी पठाणपट्टे, भाष्कर कंकाळ, तुकाराम रेंगेसह सर्व पदाधिकाऱ्यांनी सहकार्य केले.